
# मेहता मराठी ग्रंथजगत

जून, २०२६
पृष्ठे ६८ किंमत : रु.१५
वर्ष सव्विसावे
अंक सहावा



# साहित्य पुरस्कारासाठी आवाहन



## ‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’



‘मेहता पब्लिशिंग हाऊस’चे संचालक श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ सन २०२४ पासून **‘प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कार’** देण्यास सुरुवात झाली. या पुरस्काराची घोषणा १० जानेवारी, २०२३ रोजी डॉ. किरण बेदी यांच्या उपस्थितीत करण्यात आली होती. या पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे असून साहित्य क्षेत्रात प्रथम प्रकाशनास प्रोत्साहनपर हा पुरस्कार दिला जाणार आहे.

**सर्वोत्कृष्ट कादंबरी**
**₹ ३०,०००/-**

**सर्वोत्कृष्ट कथासंग्रह**
**₹ २०,०००/-**

### पुरस्कारासाठी अर्ज करण्यासंदर्भात प्राथमिक नियम व अटी :

१ ऑक्टोबर, २०२५ ते ३० सप्टेंबर, २०२६ दरम्यान प्रकाशित झालेली लेखकाची पहिली कादंबरी किंवा कथासंग्रह या पुरस्कारासाठी ग्राह्य धरली जाईल.

अर्ज स्वीकृतीची अंतिम तारीख : १ नोव्हेंबर, २०२६पर्यंत

पात्र इच्छुकांनी पुस्तकाची एक प्रत, संपूर्ण परिचय, संपूर्ण माहिती (नाव, पत्ता, संपर्क क्रमांक) आणि फोटो आमच्या पत्त्यावर पाठवावे.

या पुरस्काराची घोषणा डिसेंबर, २०२६मध्ये केली जाईल.
१२ जानेवारी, २०२७ रोजी श्री. सुनील मेहता यांच्या स्मृतिदिनी पुरस्काराचे वितरण केले जाणार आहे.

# मेहता मराठी ग्रंथजगत

♦ जून २०२६ ♦ वर्ष सव्विसावे ♦ अंक सहावा

**संपादक**
अखिल मेहता

**संस्थापक संपादक**
शंकर सारडा

**संपादन साहाय्य**
अंजली पटवर्धन

**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा
ऑनलाइन पाठवावी.

**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस

**मांडणी-अक्षरजुळणी**
मेहता पब्लिशिंग हाऊस


## – अनुक्रमणिका –


| | |
|---|---|
| संपादकीय | ४ |
| विशेष लेख | १० |
| पुरस्कार | २२ |
| श्रद्धांजली | २४ |
| **पुस्तकाच्या पानांतून** | |
| द आर्ट ऑफ मॅनेजमेंट | २६ |
| ब्रेड , सिमेंट , कॅक्टस | ३६ |
| चुंबन | ४४ |
| अभिप्राय | ५२ |
| दिनविशेष | ६० |


संपादक-मुद्रक-प्रकाशक : अखिल मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर, पुणे ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२ I E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक अखिल सुनील मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून, १९४१ सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - अखिल सुनील मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Akhil Sunil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Akhil Sunil Mehta.



## संपादकीय

# चला, पर्यावरणाला जाणू या..!

*''वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे ।*
*पक्षीही सुस्वरे आळविती॥''*

जगद्‌गुरू संत तुकाराम महाराजांनी सांगितलेला हा मूलमंत्र शतकं लोटली तरी पुन:पुन्हा सृष्टीचं सौंदर्य उद्‌धृत करणारा आहे. जगातील जवळपास शंभर- पेक्षा जास्त देशांमध्ये 'जागतिक पर्यावरण दिन' ५ जून रोजी साजरा करण्यात येतो. यामागील मुख्य उद्देश इतकाच की, समाजातील हर एक माणसामध्ये पर्यावरणाविषयी जनजागृती निर्माण करणं आणि त्यातूनच संपूर्ण राष्ट्रानं एकजुटीनं पर्यावरण वाचवण्याबाबत पुढाकार घेणं. या दिवसाची संकल्पना ही दर वर्षी बदलत जात आहे आणि जात राहीलही...

म्हणून, पर्यावरणाला समजून घेताना



आधी त्याचा अर्थ समजून घेऊ. तर, ‘परि’ म्हणजे आपल्या अवतीभोवती असलेल्या गोष्टी - जैविक घटक आणि ‘आवरण’ म्हणजे आपल्या सभोवताल जे व्यापलं आहे ते - अजैविक घटक. परि आणि आवरण यांच्या एकरूपतेनं हे सुंदर ‘पर्यावरण’ निर्माण झालेलं आहे. पर्यावरणाच्या जैविक घटकांमध्ये सूक्ष्मजीवांपासून कीटक, प्राणी, वनस्पती आणि सर्व घडणाऱ्या जैविक क्रिया-प्रक्रियांचा समावेश आहे. तर, अजैविक घटकांमध्ये निर्जीव घटक आणि त्यांच्याशी संबंधित प्रक्रिया असतात. यावर आधारित काही पुस्तकं मेहता पब्लिशिंग हाऊसनंही प्रकाशित केली आहेत. ज्यात पर्यावरण म्हणजे काय? मानव आणि पर्यावरणाचं नातं कसं घडत-बिघडत गेलं? मानवाव्यतिरिक्त या सृष्टीवर असे कोणते सजीव घटक आहेत जे पर्यावरणाचं रक्षण करतात किंवा त्यांच्या असण्यानं पर्यावरणाचं संतुलन राखण्यास मदत होते... अशा नजरेआड असलेल्या प्रकृतींवर आमचे लेखक अभ्यासू वृत्तीनं लिखाण करतात. याचबरोबर मानवाच्या नजरेतून दिसणारं निसर्गाचं वेगळंच चित्रणही शब्दांतून उभं करतात.

‘वेध पर्यावरणाचा’ या पुस्तकामध्ये तर निरंजन घाटे सांगतात की, *‘माणूस हाही शेवटी एक प्राणी, एक सजीवच आहे. यामुळे त्याच्या जीवनावश्यक किंवा इतरही क्रियांचा परिणाम परिस्थितीवर घडून येतो. एवढंच नव्हे, तर इतर प्राण्यांपेक्षाही त्याचा परिणाम अधिक प्रमाणात परिस्थितीवर घडून आलाय, असंही आढळतं; असं असलं तरी बरेच जण मानव प्राणी आहे हे विसरतात; मानवाची प्रत्येक क्रिया ही निसर्गविरोधीच आहे असं काही जण म्हणत असतात, तेव्हा मानव हाही पृथ्वीवरच्या परिस्थितीचाच एक घटक आहे, हे ते विसरतात. मानव हा निसर्गा पलिकडचा किंवा निसर्गातीत आहे...’* असा मानवजातीचा आणि निसर्गाचा सखोल अभ्यास हा ‘पर्यावरण प्रदूषण’, ‘शास्त्रज्ञांचे जग’, ‘वसुंधरा’, ‘निसर्गपुत्र’ यांसारख्या पुस्तकांमधूनही निरंजन घाटे वाचकांसमोर सोप्या पद्धतीने मांडतात.

त्याचबरोबर व्यंकटेश माडगूळकरांच्या नजरेतून दिसणारा ‘नागझिरा’

सांगून जातो की, *‘जुनी पाने गळून गेली होती, नवी अजून फुटत होती. तळ्याच्या डाव्या तीरावरचा एक भव्य शाल्मली, तर शांतिपर्वातल्या कथेतील वाऱ्याशी पैज घेऊन घाबरलेल्या आणि पराभव टाळण्यासाठी हल्ला होण्याआधी स्वत:च पानं, फुलं, फांद्या मोडून टाकून उभा असलेल्या शाल्मली वृक्षासारख्या निव्वळ खराटा होऊन उभा होता.’* अशा सिद्धहस्त लेखणीतून मानवाला खऱ्या निसर्गाशी जवळीक साधण्याची संधी लेखक देऊन जातात... व्यंकटेश माडगूळकरांच्या ‘जंगलातील दिवस’, ‘मंतरलेले बेट’, ‘हस्ताचा पाऊस’ यांसारख्या कथा-कादंबऱ्यांमधला निसर्ग हा खूप बोलका असल्यामुळे वाचकाला त्या निसर्गात रमण्याचा अनुभव मिळतो. तसंच या कथा-कादंबऱ्यांतील निसर्गाला आता प्रत्यक्षात न अनुभवता येण्याची खंत काहीवेळा होते. कारण, त्या वर्णनाशी मिळतंजुळतं आजूबाजूला काही दृष्टीस पडत नाही. प्राण्यांच्या आणि पक्ष्यांच्या काही जाती लुप्त झालेल्या आहेत आणि काही लुप्त होण्याच्या मार्गावर आहेत.

तरीही या सृष्टीतील प्रत्येक जीवाला समजून घेण्यासाठी डॉ. किशोर पवार आणि डॉ. नलिनी पवार हे त्यांच्या ‘आपली सृष्टी’ या शीर्षकांतर्गत येणाऱ्या ‘आकाशसम्राट पक्षी’, ‘सरपटणाऱ्या प्राण्यांचे जग’, ‘उभयचरांचे अनोखे विश्व’ आणि सद्य परिस्थितीला अनुसरून असलेले ‘वायू-प्रदूषण’ या पुस्तकांतून सहज सोप्या भाषेत व्यक्त होतात.

यांसारख्या पुस्तकांमधून एकच जाणवतं की, आताच्या काळात पर्यावरण वाचवणं किती गरजेचं आहे. जुन्या पिढीनं अनुभवलेला निसर्ग नवीन पिढीपर्यंत तसाच जतन करणं, किंबहुना करत राहणं ही प्रत्येक पिढीची जबाबदारी आहे. पर्यावरण ही काळाची नाही तर प्रत्येक जीवाची गरज आहे. आजकाल याचा विसर काही अंशी पडताना दिसतो. मनुष्य आणि पर्यावरण एकमेकांवर अवलंबून आहेत. हवा-जल-मृदा-प्रदूषण किंवा झाडांबरोबरच धरेला जागवणाऱ्या अन्य कीटकांचं सृष्टीवरून नष्ट होणं किंवा त्यांचं अल्प स्वरूपात उरणं या पर्यावरणीय बदलाचा

थेट परिणाम मानवी शरीरावर आणि आरोग्यावर होतो. म्हणून झाडांची जोपासना करणे, स्वच्छता राखणे, वायू-जल-मृदा-प्रदूषण रोखण्यास मदत करणं इ. गोष्टी पर्यावरणाला वाचवण्यास मदत करतात. हे सर्व जरी शालेय शिक्षणातील वाटत असलं तरी ते मानवाचं जीवन आणि सृष्टीचं संवर्धन या दोहोंसाठी आवश्यक आहे.

मेहता पब्लिशिंग हाऊसमधील अशी नानाविध प्रकारानं पर्यावरणाचं दर्शन घडवणारी पुस्तकं म्हणजे ठेवणीतला खजिनाच आहे. आमच्या वाचक परिवारातील प्रत्येकासाठी तो सतत भरलेला असतो आणि भरत राहील.

*'वृक्षसंवर्धन करू या... पर्यावरण वाचवू या..!'*

अखिल
मेहता

*रम्य विराजे माथ्यावरतीं*
*निळ्या नभाची कांती शीतल*
*हिरवळ पसरे पायांखालीं*
*सन्निध निर्झर करितो झुळझुळ!*
*-('वर्षा' - शान्ता शेळके)*

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी**
**आजच वर्गणीदार व्हा**

आमच्या छापील अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ४५० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ६०० रुपये**

डिजिटल अंकाची वर्गणी

**त्रैवार्षिक वर्गणी ३०० रुपये**
**पंचवार्षिक वर्गणी ४०० रुपये**

*Available on*

amazonkindle | Google Play Books

अधिक माहिती जाणून घेण्यासाठी
आम्हाला फॉलो करत रहा!

**http://www.facebook.com/mehtapublishinghouse**


टी बुक क्लब
मेहता पब्लिशिंग हाऊस
टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
BOOK CLUB
या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किमतीत मिळवा!
आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा.
पोस्टेज खर्च अतिरिक्त
* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक
'टी बुक क्लब' ची ग्रंथसूचि पाहण्यासाठी QR कोड स्कॅन करा
फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५
सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक -
www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx


नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स... मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी, सोयीस्कर – थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड, किंडल आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!
॥ स्वामी ॥
रणजित देसाई
ebook
available on :
Google Play Books
amazon kindle
Get it on Apple Books



## विशेष लेख

# वि. स. खांडेकर - सुवर्णस्मृती वर्ष

२ सप्टेंबर, २०२५ ते १ सप्टेंबर, २०२६ वि. स. खांडेकर सुवर्णस्मृती वर्ष म्हणून देशभर साजरे होत आहे. या निमित्त मेहता पब्लिशिंग हाऊसनं वि. स. खांडेकर यांचे काही अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्याचं ठरविलं आहे. लवकरच ते साहित्य विविध वाङ्मय प्रकारांच्या स्वरूपात वाचकांच्या भेटीस येईल.

वि. स. खांडेकर यांचे राजात्स्मृती वर्ष २००१ ते २००२ या काळात साजरे केले गेले होते. त्या वेळीही मेहता पब्लिशिंग हाऊसनं वि. स. खांडेकरांच्या अप्रकाशित, अलक्षित साहित्याचं संपादन करून प्रकाशित करण्याचा संकल्प सोडला होता. विख्यात साहित्यिक व संपादक डॉ. सुनीलकुमार लवटे यांच्या संपादनाखाली मेहता पब्लिशिंग हाऊसनं वाचकांसाठी त्या काळात २८ अप्रकाशित साहित्यकृती उपलब्ध करून दिल्या. त्यांची सूची या अंकात स्वतंत्रपणे देत आहोत.

या असंकलित व अप्रकाशित साहित्यामुळे वि. स. खांडेकरांचे पुनर्मूल्यांकन मराठी समीक्षा विश्वात सुरू झाले आहे. त्याचा पुढचा टप्पा म्हणून अप्रकाशित कादंबऱ्या, चरित्रं, प्रस्तावना खंड, लघुनिबंधसंग्रह असा दुर्मिळ ऐवज घेऊन मेहता पब्लिशिंग हाऊस येत आहे.



या पार्श्वभूमीवर आजवर प्रकाशित झालेल्या वि. स. खांडेकरांच्या असंकलित साहित्याबद्दल, मराठीतील विख्यात समीक्षक प्रा. डॉ. रणधीर शिंदे यांनी ग्रंथाली वाचन चळवळीच्या ५१ व्या वाचकदिनानिमित्तानं व्याख्यान दिलं होतं. ते व्याख्यान वि. स. खांडेकर सुवर्णस्मृती वर्षाच्या निमित्तानं या अंकात आम्ही विशेषत्वानं प्रकाशित करीत आहोत.

# वि. स. खांडेकरांच्या असंकलित-अप्रकाशित वाङ्मयाचा पुनर्शोध

डॉ. सुनीलकुमार लवटे यांचे व्यक्तिमत्त्व हे बहुपेडी स्वरूपाचे आहे. कायम व्यासंग साधना, संशोधन आणि संकलनामध्ये रममाण असणाऱ्या प्रा. लवटे यांचा ग्रंथाली प्रकाशन आणि ठाणे ग्रंथ संग्रहालय सन्मान करत आहेत, ही बाब महत्त्वाची आहे. हिंदी भाषासाहित्याचे प्राध्यापक म्हणून त्यांनी दीर्घकाळ काम केले आहे. ते प्राध्यापक होते. त्यांनी वंचित मुलांसाठी काम केले. अनुवादक म्हणून त्यांची ओळख आहे. मराठी आणि हिंदी असे त्यांचे द्वैभाषिक काम आहे. साने गुरुजींची 'आंतरभारती'ची दृष्टी डॉ. लवटे यांच्या कामामध्ये आहे. वि. स. खांडेकरांचं संग्रहालय, यशवंतराव चव्हाण (नाशिक) व साने गुरुजींचं संग्रहालय उभं करण्यात डॉ. लवटे यांचा मौलिक वाटा आहे. 'खाली जमीन वर आकाश'सारखे त्यांचे वंचितांच्या जीवनाविषयी उल्लेखनीय आत्मकथन प्रकाशित आहे. कामाची अखंड ऊर्जा आणि शोधक दृष्टी लवटे यांच्या कार्यात आहे. संपादक म्हणून त्यांनी वि. स. खांडेकरांची अठ्ठावीस पुस्तके प्रकाशित केली आहेत. खांडेकरांचे असंग्रहित आणि अप्रकाशित साहित्य प्रकाशित करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. या ग्रंथांना त्यांनी छोटेखानी दोन-तीन पानांच्या सुबक अशा नेटक्या प्रस्तावना लिहिल्या आहेत. त्या परिचय स्वरूपाच्या असल्या तरी त्या पुस्तकांचे अंतरंग उलगडून दाखवणाऱ्या आहेत. खांडेकरांच्या त्या-त्या पुस्तकाचे सार या प्रस्तावनांमध्ये आहे.

२००१-०२ हे खांडेकरांच्या मृत्यूचे पंचविसावे वर्ष होते. प्रा. लवटे यांनी व प्रकाशकांनी सगळ्या पुस्तकांमध्ये 'रजत' असा उल्लेख केला आहे. ते हिंदीचे शिक्षक असल्यामुळे, त्यांच्या लेखनावर हिंदी भाषेचा प्रभाव आहे.

या दरम्यान खांडेकरांच्या समग्र वाङ्मयाचा नव्याने शोध घ्यावा, असे त्यांना वाटले. त्याची नीजखूण त्यांना सापडली, ती जया दडकर यांच्या 'वि. स. खांडेकर सचित्र चरित्रपटा'मध्ये. मराठीतील हे उल्लेखनीय पुस्तक आहे. दडकर यांनी खांडेकर चरित्रसूची निष्ठेने, तळमळीने केली आहे. एका लेखकाच्या जीवनचरित्राचा, खुणांचा किंवा त्या काळाचा, घडामोडींचा मागोवा घेतला आहे. खांडेकर दररोज कुठे जात होते, काय करत होते, कुणाला भेटत होते, कुणाला पत्रे लिहीत, कोणत्या नियतकालिक, दैनिकांत त्यांच्या बातम्या येत, याचा सर्वांगीण शोध दडकरांनी या सूचीत घेतला आहे. तो प्रेरक आहे. प्रा. लवटे यांनी त्यानंतर खांडेकरांच्या उर्वरित लेखनाचा कसून शोध घेतला. दडकरांच्या चरित्रामध्ये खांडेकरांच्या वंशावळी, त्यांच्या कार्यक्षेत्राचा नकाशा आहे. खांडेकरांच्या जीवनाशी निगडित १८९८ ते १९७६ या काळातील हा अभ्यास आहे. खांडेकरांचे लेखन कुठे प्रकाशित झाले, याचे असंख्य तपशील दडकरांच्या लेखनात आहेत. त्याचा आधार लवटे यांच्या या संपादन मालिकेमागे आहे.

शालेय जीवनामध्ये सुनीलकुमार लवटे ज्या शाळेत शिकत होते, त्या शाळेच्या संस्थेचे अध्यक्ष वि. स. खांडेकर होते. त्यांची भाषणं त्यांनी लहानपणी ऐकली होती. त्यामुळे धडपडणारी, ध्येयवादी, तळमळणारी दृष्टी डॉ. लवटे यांच्या कार्यदृष्टीमध्ये आहे. २००१-०२ या वर्षानिमित्तानं खांडेकरांचा त्यांनी शोध सुरू केला. खांडेकरांच्या कथा, कादंबऱ्या, ललितगद्य, मुलाखती, स्तंभलेखन, पत्रव्यवहार, वैचारिक स्वरूपाचे लेखन, समीक्षात्मक स्वरूपाचे लेखन असे विपुल आणि विखुरलेले साहित्य त्यांनी संकलित केले. वि. स. खांडेकर असंख्य ठिकाणी लिहीत. त्यांचा लिहिण्याचा वेग मोठा होता व तो अचंबित करणारा आहे.

दुसरा एक इथे उल्लेख करावासा वाटतो की, मेहता पब्लिशिंग हाऊसने ही सगळी पुस्तके त्याचे व्यावसायिक स्वरूप लक्षात न घेता आनंदाने प्रकाशित केली आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणामध्ये हळूहळू गतविस्मृतीत जाणाऱ्या लेखकाची इतकी पुस्तकं प्रकाशित करणे हेदेखील आजघडीला महत्त्वाचे आहे. आपल्या सांस्कृतिक परंपरेमध्ये लेखकाच्या वारसांकडून लेखन जपून ठेवले जात नाही, अशी सांस्कृतिक अनास्था सर्वत्र दिसते.

खांडेकरांचे मराठीमध्ये लेखक म्हणून ज्या प्रकारचे स्थान आहे,

त्याचे काहीएक अर्थनिर्णयन झाले आहे असे वाटत नाही. एका बाजूला ते लोकप्रिय होते, दुसऱ्या बाजूला ते टीकेचे धनी झाले. आधुनिक लेखकांनी त्यांच्या लेखक म्हणून असणाऱ्या प्रतिमेवर हल्ले केले. कुसुमावती देशपांडे, गंगाधर गाडगीळ, स. शि. भावे, भालचंद्र नेमाडे, नामवर सिंह, गो. पु. देशपांडे अशा अनेक लेखकांनी खांडेकरांच्या लेखनाच्या मर्यादा सांगितल्या. खांडेकर वाङ्मय बाळबोध आहे, ते स्वप्नाळू आहे, आदर्शवादी आहे, रंजनवादी आहे, या पद्धतीने त्यांच्याकडे पाहिले. परंतु, दुसऱ्या बाजूला भारतीय लेखक आणि भारतीयत्वाची मूल्ये खांडेकरांच्या लेखनामध्ये आहेत, यादृष्टीने त्यांच्याकडे पाहिले आहे. आदर्शांबद्दलचा त्यांचा ओढा, गांधीवाद आणि मार्क्सवादाबद्दलचे आकर्षण व त्यांच्या विचारदृष्टीतील द्वंद्व आणि स्वप्नसृष्टीबद्दल लिहिले गेले. खांडेकरांना ज्ञानपीठ मिळाल्यानंतर त्यांचा कोल्हापुरात सत्कार झाला. त्यावेळचे सगळ्यात चांगले भाषण यशवंतराव चव्हाण यांचे आहे. 'हा लेखक प्रकाशाचा लेखक आहे, हा उजेडाचा लेखक आहे, हा चांदण्यांचा लेखक आहे, हा चैतन्याचा लेखक आहे आणि नव्या उभरत्या महाराष्ट्राच्या मध्यमवर्गीय स्वप्नकांक्षेचे चित्र खांडेकरांच्या लेखनामध्ये येते.' असे अर्थनिर्णयन यशवंतराव चव्हाण यांनी केले होते. सगळ्या समीक्षेमध्ये हे फार महत्त्वाचे वाटते.

खांडेकरांचे एवढे डोंगराएवढे साहित्य काळाच्या उदरात लुप्त होण्याची जास्त शक्यता होती. हे लेखन नियतकालिके, दिवाळी अंक, वृत्तपत्रे, दैनिकांमधील कोपऱ्यात कुठेकुठे दडलेले होते. त्यामुळे पूर्वार्धातील व उत्तरार्धातील खांडेकर विस्मृतीत जाण्याची शक्यता होती. अशा ३५० कथा, चार रूपककथासंग्रह, अप्रकाशित कांदबरी, लघुनिबंधसंग्रह, लेखसंग्रह, चित्रपटकथासंग्रह व अन्य लेखनाचे संग्रह लवटे यांनी मेहनतीने प्रकाशित केले आहेत. स्वातंत्र्योत्तर काळामध्ये महाराष्ट्राचे सांस्कृतिक लेखननेतृत्व ज्यांनी केले, त्यांच्याविषयी हे तळमळीने करावे, या धारणेतून खांडेकरांच्या असंकलित साहित्याचा शोध प्रा. लवटे यांनी घेतला. यामागे खांडेकर वाङ्मयाचे मूल्यांकन व्हावे अशी दृष्टी आहे. डॉ. लवटे यांनी जवळपास तीन हजार पाने भरतील एवढे वि.स. खांडेकरांचे साहित्य प्रकाशात आणले. जी चिकाटी, निष्ठा, सामाजिक बांधिलकी, लेखकांच्याबद्दल आदर, श्रद्धा लागते ती लवटे यांच्यामध्ये दिसते. खांडेकर हे लवटे यांचे श्रद्धास्थान आहे. या

काळात त्यांनी खांडेकरांची पुस्तके खांडेकर कुटुंबीयांकडून मिळवली. काही मिळाली नाहीत. त्यांनी खांडेकरांचे कुटुंबीय, नातलग, प्रकाशक, संपादक, ग्रंथालये, विविध संस्था, शिवाजी विद्यापीठातील दुर्मिळ ग्रंथविभाग, मुंबई मराठी ग्रंथसंग्रहालय, शासकीय ग्रंथालय, बेळगाव, सावंतवाडी, वृत्तपत्रांची कार्यालये, राष्ट्रीय फिल्म संग्रहालय, आकाशवाणी, दूरदर्शन इथून असंकलित आणि असंग्रहित ऐवज मिळवला. यात अनेक छायाचित्रांचा समावेश आहे.

'ययाति'मुळे खांडेकरांची एक विशिष्ट ओळख आहे. हा परीघ ओलांडून खांडेकरांच्या विचारविश्वाकडे, भावविश्वाकडे, त्यांच्या वाङ्मयाकडे बघण्याची पुनःदृष्टी प्राप्त व्हावी, अशा खुणा त्यांच्या या अठ्ठावीस पुस्तकांमध्ये आहेत. नव्या काळामध्ये नव्या दृष्टीने त्यांचे अर्थनिर्णयन होऊ शकते. याच्या असंख्य वाटा आणि खुणा या असंकलित वाङ्मयामध्ये आहेत. एका अर्थाने लेखकाला समजून-उमजून घेणे किंवा त्याचे पुनर्मूल्यांकन करणे अशी दृष्टी त्यामध्ये आहे. काळाचे आणि भौतिक जीवनाचे पडसाद खांडेकरांच्या लेखनामध्ये कसे उमटले, विशेषतः १९६०नंतरच्या काळाचा खांडेकर काय विचार करत होते, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय घडामोडींकडे ते कोणत्या दृष्टिकोनातून पाहत होते, ते काळसन्मुख होते की पाठमोरे होते, याच्या खुणा या वाङ्मयात आहेत. त्यांचे मावळतीचे रंग त्यांच्या या सर्व वाङ्मय प्रकारांतील लेखनात आहेत. खांडेकरांना नव्याने समजून घेण्याच्या दृष्टीने हे असंकलित वाङ्मय महत्त्वाचे आहे.

या असंकलित वाङ्मयात खांडेकरांचे 'समाजशिल्पी', 'जीवनशिल्पी', 'साहित्यशिल्पी' व्यक्तिचित्रांचे संग्रह महत्त्वाचे होत. त्यांचे जीवन व मूल्यविषयक विचार समजून घ्यायला हे संग्रह महत्त्वाचे होत. खांडेकरांचे विचारविश्व व महाराष्ट्राविषयीचा कानोसा लक्षात येतो. यातले बरेचसे लेख प्रासंगिक आहेत. वाढदिवस, अमृत महोत्सव, श्रद्धांजली यानिमित्ताने लिहिलेले आहेत. खांडेकरांचा समाजाशी, व्यक्तींशी, काळाशी असणारा ऋणानुबंध दर्शविणारे हे लेख आहेत. यातल्या बऱ्याचशा व्यक्ती त्यांच्या काळातल्या होत्या. 'किर्लोस्कर', 'मांडवी', 'मनोहर' यांसारख्या मासिकांमधून ते लेख प्रसिद्ध झाले होते. 'समाजशिल्पी' या पुस्तकामध्ये चौदा व्यक्तिचित्रणे आहेत. लोकमान्य टिळक, कर्वे, महर्षी शिंदे, सावरकर, छत्रपती शाहू महाराज, साने गुरुजी, बाबा आमटे यांचा त्यात समावेश आहे. व्यक्तींचे कार्य आणि व्यक्ती

आकलन, व्यक्तीची कार्यपद्धती समजून घेण्याची खांडेकरांची कार्यपद्धती कशी होती, हे यामधून जाणवते. अगदी टिळकांचे सूत्ररूपाने वर्णन, 'बुद्धी, त्याग आणि तेजाची त्रिवेणी' असे केले आहे. माधवराव बागल हे त्यांचे अत्यंत जिव्हाळ्याचे मित्र होते. या दोघांच्या संबंधाविषयी खांडेकरांनी हृद्य असा लेख लिहिला आहे. तो फार वेगळ्या आणि अप्रतिम स्वरूपाचा आहे. कला आणि क्रांतीचे उपासक म्हणून बागलांकडे त्यांनी पाहिले आहे. बागलांच्या जीवनातील पडझड, राजनिष्ठा आणि समाजनिष्ठा यांतल्या अटळ संघर्षाच्या खुणा बागलांच्या चरित्रामध्ये कशा प्रकारे पाहायला मिळतात हे या लेखावरून कळते.

दुसरे एक असे की, आपण राजकारणाबद्दल काही चुकीची गृहीतके मांडत असतो. वसंतदादा पाटलांच्याबद्दल आणि त्यांच्या जीवनातल्या विवाहासंबंधाने खांडेकरांनी एक लेख लिहिला आहे आणि तो खूप सकारात्मक स्वरूपाचा आहे. त्यामध्ये त्यांनी वसंतदादांचा 'खरेखुरे बंडखोर' असा उल्लेख केला आहे. महर्षी विठ्ठल रामजी शिंद्यांबद्दल लिहिताना त्यांनी 'अस्पृश्यतेचे उद्धारक' असे म्हटले आहे. १९३४ मध्ये खांडेकरांनी महर्षी शिंद्यांना बडोद्याच्या संमेलनामध्ये पाहिले होते. त्यांचा 'कर्मयोगी', 'ज्ञानयोगी' आणि 'भक्तियोगी' म्हणून खांडेकरांनी उल्लेख केला आहे. त्याचबरोबर त्यांचे जे हिरो आहेत, 'ज्यांची अंगं धुळीने भरलेली आहेत; पण ज्यांची दृष्टी आकाशातल्या चांदण्यांवर खिळलेली आहे.' अशी एक आदर्शांची स्वप्नसृष्टीदेखील या सामाजिक नायकांच्या निमित्ताने खांडेकरांच्या लेखनामधून व्यक्त झालेली आहे.

आणखी एक दुर्लक्षित लेखक म. भा. भोसले हे कृष्णाकाठच्या धनगाव नावाच्या गावी राहत होते. खेड्यातल्या माणसांची पुस्तके शहरातले प्रकाशक छापत नाहीत, म्हणून त्यांनी 'ग्रामीण साहित्य' नावाची प्रकाशन संस्था गावात स्थापन केली होती. खांडेकरांनी त्यांच्या एका कादंबरीवर एका दिग्दर्शकांना सांगून चित्रपट करवून घेतला होता. १९३५साली खांडेकर शिरोड्याला असताना अनेक पत्रे ही पुस्तके, ब्लर्ब लिहिण्यासाठी यायची. एके दिवशी दुपारीदुपारी शाळेमध्ये त्यांना एक बॉक्स भेट म्हणून आला आणि त्यांनी मुलांच्यासमोर तो उघडून पाहिला. त्यामध्ये लाल रंगाचा स्कार्फ (गळपट्टा) म. भा. भोसल्यांनी खांडेकरांना भेट म्हणून पाठवून दिला होता. हा प्रसंग

खांडेकरांनी ज्या जिव्हाळ्याने, ज्या ओलाव्याने आणि आस्थेने लिहिला आहे, अशा प्रकारची आस्था आजच्या सांस्कृतिक जीवनामध्ये आपल्याला अभावानेच आढळते. त्यांचा हा एक महत्त्वाचा पैलू या अशा असंकलित लेखनातून समोर येतो.

दुसरा एक खांडेकरांचा पैलू यानिमित्ताने समोर आला, तो म्हणजे पत्रकार खांडेकर. त्यांनी १९२४साली सावंतवाडीला 'वैनतेय' नावाचे नियतकालिक सुरू केले आणि आज त्याला शंभर वर्षे पूर्ण झाली आहेत. यात अग्रलेख, सदरे, स्तंभलेखन इतके विपुल आणि वेगवेगळ्या प्रकारचे होते. खांडेकरांची राजकारणाविषयी मते स्पष्ट होती. महाराष्ट्र आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरचे मानस याचा मागोवा कोकणातल्या एका छोट्या खेडेगावामध्ये खांडेकर 'वैनतेय' नावाच्या साप्ताहिकातून घेत होते. हे लेखन खांडेकरांच्या आरंभ काळातले. १९२४-३० ते ४०च्या कालखंडातले त्यांचे हे लेखन आहे. खांडेकरांचे राजकीय, सामाजिक भान त्यामधून प्रकटले आहे. हे प्रतिक्रियात्मक स्वरूपाचे लेखन आहे. त्यांच्या पत्रकारितेचे नाते जांभेकरांच्या आणि आगरकरांच्या पत्रकारितेशी होते. यामध्ये आठ आणि दहा ओळींची छोटी टिपणे आहेत. त्यांच्या विचारदृष्टीचा पल्ला किती वेगवेगळ्या प्रकारचा होता हे या लेखनावरून लक्षात येते. खांडेकरांची वाचनकक्षा विस्तृत होती. अमेरिकेत, इंग्लंडमध्ये काय घडलंय किंवा दिल्लीमध्ये काय घडलंय ते सावंतवाडीमध्ये कसे पोहोचत असेल? खांडेकराच्या लेखनात त्या काळातील अनेक नियतकालिकांची नावे आहेत. 'टाइम्स', 'केसरी', 'अमृतबझार', 'फिजिकल कल्चर', 'आनंद', 'क्रॉनिकल', 'प्रबुद्ध भारत', 'मॉडर्न रिव्ह्यू' आणि अनेक गुजराती आणि हिंदी नियतकालिके ते वाचत होते. जगाचे एक भान त्या दैनिकांमधून मांडलेले दिसते. हिंदू-मुस्लीम प्रश्न, साक्षरता, ब्रिटिशांबद्दल, सुधारणा, सभा, निवडणुका, गिरणी संप, अगदी १९२५साली साताऱ्याला एक सामाजिक परिषद झाली होती आणि ती परिषद विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली झाली होती, तिचा वृत्तान्त असेल, कर्व्यांचा एकाहत्तरावा वाढदिवस वृत्तान्त, असे अनेक प्रकारचे लेखन त्यामध्ये आहे.

कर्व्यांच्या एकाहत्तराव्या वाढदिवसाचं शीर्षक त्यांनी दिलंय की, 'तन नाही धन तरी द्या.' पणजीला त्यांचे एक व्याख्यान झाले होते. १९२७ सालचे एक टिपण आहे, की छत्रपती शिवाजी महाराजांसंबंधाने कित्येक इंग्रज

इतिहासकारांनी आपल्या ग्रंथांतून धादांत खोटी विधाने केली होती. त्याचा परामर्श खांडेकरांनी घेतला आहे. खांडेकर शिवाजी महाराजांच्या अनैतिहासिक इतिहासकारांच्या गोष्टींबद्दल असमाधान व्यक्त करत आहेत. महात्मा गांधींच्या धाकट्या मुलाचे लग्न, सोलापूर जिल्हा लोकल बोर्ड बरखास्त झालेल्याची गोष्ट, सांगलीचा मठ गरीब विद्यार्थ्यांसाठी बंद केला गेला, सांगलीमध्ये आंतरजातीय विवाहाला बंदी आणली गेली, सावंतवाडीला सावंत नावाचे एक भोंदू साधू होते अशी टिपणे वैनतेयमध्ये आहेत. असे बहुविध प्रकारचे लेखन यामध्ये यायचे. मिरजेला वॉनलेस नावाचे एक ब्रिटिश सेवाभावी मिशनरी अधिकारी होते. त्या संस्थानी गावामुळे नव्हे, तर अमेरिकन मिशनऱ्याचा सेवाभावी गुण आणि तिथल्या कोरड्या हवेचा गुण म्हणून वॉनलेसचा त्यांनी उल्लेख केला आहे. १९२७साली महाडला आंबेडकरांच्या अध्यक्षतेखाली सत्याग्रह झाला. सभा झाली, ती सभा संपल्यानंतर अस्पृश्यांवर वाटेत काही मंडळींनी हल्ले केले, त्याचा वृत्तान्त या लेखनात आहे. पत्रकार, स्तंभलेखक म्हणून खांडेकरांचे एक नवे प्रतिमान या दोन-तीन पुस्तकांमधून आले आहे.

दुसरे म्हणजे त्यांच्या काही कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. त्यातील एक कादंबरी १९५०साली 'नवी स्त्री' शीर्षकाने प्रकाशित झाली. खांडेकरांचा सुधारणेकडे, सुशिक्षित स्त्रियांच्याकडे बघण्याचा दृष्टिकोन या कादंबरीत आहे. बी. ए. झालेली एक तरुणी आहे, तिच्या जगण्यासंबंधीची ही कहाणी आहे. त्याच्यामध्ये प्रेमाचा एक कल्ट आहे. समाजवादी आणि गांधीवादी अशा द्वंद्वामध्ये अडकलेल्या नायिकेचे चित्र कादंबरीत आहे. नायिका विज्ञानाविषयीची पुस्तके वाचते. नायक मार्क्सवादी विचारदृष्टीचा आहे. त्या काळातल्या फेमिनिस्ट चळवळीच्या पाऊलखुणा खांडेकरांच्या कादंबरीमध्ये दिसतात. त्यातले एक पात्र आहे. स्त्रीवादी. खांडेकर त्या काळामध्ये हे सांगताहेत. रामाबद्दल एक प्रतिकार भूमिका खांडेकरांच्या १९५० सालच्या या कादंबरीत आहे. पात्र असे सांगते की, रामाचे राज्य इतरांच्या दृष्टीने आदर्श असेल; पण सीतेच्या दृष्टीने? असा प्रश्न त्यांनी उपस्थित केला आहे. पतीच्या राज्यात त्या सतीवर केवढा अन्याय झाला आणि निष्कलंक पत्नीचा त्याग म्हणून 'रामायण' ही स्त्रीच्या गुलामगिरीची गोष्ट आहे, अशी 'रामायणा'ला प्रतिकार करणारी गोष्ट खांडेकरांच्या १९५० सालच्या कादंबरीमध्ये आहे. आपल्याकडे १९७०-८० नंतर हे चर्चाविश्व सुरू झाले. हा एक वेगळा

स्त्रीसुधारणेचा पैलू त्यांच्या या कादंबरीत आहे.

चित्रपट, पटकथाकार म्हणून खांडेकर आपल्याला फारसे माहीत नव्हते. परंतु, डॉ. लवटे यांनी त्यासंबंधी जो खंड प्रकाशित केला, त्यामध्ये खांडेकरांनी जवळपास अठ्ठावीस मराठी, हिंदी, तेलुगू आणि तमिळ चित्रपटांच्या कथा घेतल्या आहेत. त्यांनी गाणी लिहिली. त्याच्या संहिता फार वेगळ्या पद्धतीने मांडलेल्या आहेत. त्यांची चित्रपट क्षेत्रातली कामगिरी उज्ज्वल स्वरूपाची होती. सिनेमा खेळ कुठे झाला? कलावंत कोण होते? संगीत कुणाचे होते? दिग्दर्शक कोण होते? याची फार चांगली माहिती या खंडामध्ये आहे. त्यांच्या एका बोलपटामध्ये अमर शेखांनी भूमिका केली होती किंवा 'माझं बाळ'मध्ये माधव ज्युलियन यांनी त्यांची लोकप्रिय कविता 'प्रेमस्वरूप आई' ही स्वतः गायली होती. मंगेशकर भावंडांच्या भूमिका त्यांच्या काही चित्रपटांमध्ये होत्या. चित्रपट पटकथाकार म्हणून काम करतानाही खांडेकरांच्या कथात्म साहित्यातून त्यांचा ध्येयवाद आणि स्वप्नाळू दृष्टी पडद्यावर कशा पद्धतीने येत गेली त्याबद्दलच्या संहिता त्यांनी लिहिल्या आहेत. त्यातून त्यांचा सामाजिक दृष्टिकोन लक्षात येतो.

दुसरे आणखी, या पुस्तकामुळे असे झाले की, आत्मकथनकार खांडेकर वाचायला मिळाले. याआधी त्यांचे आत्मचरित्र उपलब्ध आहे; परंतु त्याशिवाय खांडेकरांनी जे आत्मपर स्वरूपाचे लेखन केले, त्याचे दोन खंड लवटे यांनी प्रकाशित केले आहेत. विशेषतः सांगलीतले त्यांचे बालपण, ब्राह्मण कुटुंबातले दारिद्र्य, गणपती पेठ, गल्ल्या, घर, वडिलांचा करुण असा मृत्यू, कृष्णेमधले पोहणे, कृष्णाकाठच्या वांग्यांपासून देवलांच्या नाटकांपर्यंतच वेड आणि पुस्तकांचे वेड या फार हृद्य गोष्टी खांडेकरांनी 'सशाचे सिंहावलोकन' या ग्रंथामध्ये सांगितल्या आहेत. त्याचबरोबर पहिले नाटक त्यांनी कधी लिहिले, वासुदेवशास्त्री खऱ्यांनी ते नाटक कसे ऐकले, त्यांच्या ऐकण्यामुळे त्यांच्यात कशा प्रकारचा आत्मविश्वास निर्माण झाला... शिरोड्याचे दिवस, कोकणातले दिवस याविषयीही त्यांनी लिहिले आहे. आपल्या आयुष्यावर परिणाम करणारे तीन ग्रंथ ते सांगतात : 'अरेबियन नाइट्स', 'रामायण' आणि 'सुदाम्याचे पोहे.' एका ठिकाणी त्यांनी असेही म्हटलंय की, मला स्वर्गसफर करण्याची जर कुणी विचारणा केली आणि कोणते दोन ग्रंथ मी सोबत घेऊन जाऊ शकतो असे विचारले, तर ते असतील तुकारामांची गाथा आणि रामायण.

तसेच त्यांना तीन व्यसने होती - चहा पिणे, फिरणे आणि पुस्तके वाचणे. 'पहिली पावलं' हा एक महत्त्वाचा ग्रंथ आहे. खांडेकरांनी प्रथम काय लिहिले, पहिले पुस्तक कधी वाचले, पहिला वाङ्मय प्रकार कुठला लिहिला, कविता कधी लिहिली, कथा कधी लिहिली, लघुनिबंध कधी लिहिला... हे सगळे यात येते. खांडेकरांचे वाङ्मयीन चरित्र समजून घेण्यासाठी 'पहिली पावलं' हे पुस्तक फार महत्त्वाचे आहे. त्यांच्या आवडीनिवडी, रुची, वाङ्मयीन दृष्टिकोन असे पैलू यामधून दिसतात.

आणखी एक पैलू म्हणजे, ललित लेखक खांडेकर आपल्याला माहीत आहेत; परंतु समीक्षक खांडेकर फारसे माहीत नाहीत. त्यांच्या तीन-चार पुस्तकांमधून खांडेकरांचे समीक्षापर लेखन आहे. प्रस्तावना आणि परीक्षणेही त्यांनी लिहिली. यामध्ये त्यांची स्वतंत्र, स्वागतशील दृष्टी आहे. अगदी हरिभाऊ आपट्यांपासून त्यांचे जे दोन लेखक आवडते होते, ते म्हणजे 'गडकरी' आणि 'कोल्हटकर.' यांच्या वाङ्मयाचे आकलन अतिशय चांगल्या पद्धतीने आणि उत्स्फूर्तपणे, भरभरून मांडणी केलेल्या खुणा त्यामध्ये दिसतात. अगदी हरिभाऊ आपट्यांच्याबद्दल त्यांनी म्हटले आहे. 'महाराष्ट्राचे हरिभाऊ.' 'चिपळूणकर व आगरकर यांची शिकवण शर्करावगुंठित करून हरिभाऊंनी महाराष्ट्राच्या गळी उतरवली आहे.' श्रीपाद कृष्ण कोल्हटकर हा तर त्यांच्या फार जिव्हाळ्याचा विषय होता. कोल्हटकरांच्या सबंध वाङ्मयाचे, त्यांच्यावर गारूड होते. सामाजिक सुधारणेचा, त्यांच्या विनोदात्मक वाङ्मयाचा, 'सुदाम्याच्या पोहे' या पुस्तकाचा अत्यंत गौरवाने उल्लेख खांडेकरांनी केला आहे. कोल्हटकरांच्या वाङ्मयातील स्वतंत्रता, विनोद, कल्पनाप्रचुरता, डौलदार भाषा, शास्त्रीयता, सरस टीका या अभ्रणांनी कोल्हटकरांनी प्रथमतः मराठी सजवली. कोल्हटकरांच्याकडे बघण्याची त्यांची भावना गौरवाचीदेखील आहे. कोल्हटकरांच्या वाङ्मयामध्ये रोमॅन्टिकतेचे आकर्षण आहे. खामगाव किंवा जळगावसारख्या दूर, आडवळणांच्या गावांमुळे अद्‌भुततेचे स्थान कोल्हटकरांच्या वाङ्मयामध्ये कशा प्रकारे आलेले आहे हे ते सांगतात. त्यांच्या महाराष्ट्रगीताबद्दल खांडेकरांचा लेख आहे. खांडेकरांना कोल्हटकरांच्या महाराष्ट्र गीतामध्ये रानडे परंपरेतल्या देशभक्तीची भावना तेवत असलेली पाहायला मिळते. असा त्यांचा अन्वयार्थ आहे.

न. चिं. केळकरांच्याबद्दल लिहिलेला 'साहित्यातला वटवृक्ष' नावाचा

सुरेख असा खांडेकरांचा लेख आहे. केळकरांच्या वाङ्मयातील नम्रता आणि अनेक गोष्टींकडे समतोलपणाने त्यांनी पाहिले आहे. त्यांनी रूपक वापरलेय की, ‘आमच्या कोकणातल्या फणसाच्या झाडासारखं, ते झाड अनेक फणसांनी लगडून जावं; पण ते वाकलेलं दिसत नाही, अशा प्रकारची नम्रता केळकरांच्या जीवनामध्ये होती.’ केळकरांचे नाते टिळक-गांधींपेक्षा रानड्यांच्याशी जास्त आहे, या प्रकारचा अन्वयार्थ त्यांनी लावला. बोरकरांच्याबद्दल ‘बालेची पूजा करणारा साहित्यिक’ असे त्यांनी म्हटले आहे. कुसुमाग्रज, वा. रा. कांत, अरविंद गोखले अशा अनेक लेखकांवरही त्यांनी लिहिले. गडकरी त्यांचे आवडीचे लेखक आणि नाटककार होते. गडकऱ्यांचे चरित्र आणि त्यांच्या नाट्यवाङ्मयाचा सर्वांगीण आणि खोलवरचा शोध त्यांनी घेतला आहे. ना. सी. फडके आणि खांडेकर दोघे समकालीन लेखक. परंतु, आपल्या समकालातल्या लेखकाविषयी उदारपणाने लिहिण्याची दृष्टी खांडेकरांच्या शैलीमध्ये होती. फडक्यांच्या लोकप्रियतेचे रहस्य हे त्यांच्या शैलीमध्ये आहे आणि कल्पनारम्य सामाजिक कादंबरीचा प्रघात फडक्यांनी पाडला, असे एक त्यांचे म्हणणे होते.

खांडेकरांचे लघुनिबंध आणि कथालेखन याबद्दल असेच म्हणता येईल. हे लेखन त्यांच्या उत्तर काळातले होते. त्याविषयी लवटे यांनी ‘निरोपकथा’ असा फार चांगला शब्द वापरला आहे. लघुनिबंध हा त्यांचा अत्यंत आवडीचा साहित्यप्रकार होता. वाचकांशी हितगूज करणे, संवाद करणे, दैनंदिन जीवनातल्या गोष्टींबद्दल वाचकांशी बोलत राहणे हा त्यांचा आवडीचा भाग होता. मुख्य म्हणजे वर्तमानपत्रे हा त्यांचा एक डोळा, कॅमेरा होता. वर्तमानपत्रात ज्या बातम्या येतील, त्याच्यावर अनेक लघुनिबंध त्यांना सुचलेले आहेत. खांडेकरांना अखेरच्या काळातील कथांचा आलेख ‘निरोपकथा’ म्हणून लवटे यांनी मांडलेला आहे.

खांडेकरांच्या प्रतिमा अन्वयार्थामध्ये लवटे यांनी संपादित केलेल्या या अठ्ठावीस पुस्तकांचा मोलाचा वाटा आहे. खांडेकरांची आणखी पाच-सहा पुस्तके प्रकाशित होत आहेत. खांडेकरांचे हे सबंध अप्रकाशित आणि असंकलित साहित्य प्रकाशित करून सांस्कृतिक विश्वामध्ये प्रा. लवटे यांनी महत्त्वाचे काम केले आहे. संकलनकार, संशोधक व संपादक म्हणून

प्रा. सुनीलकुमार लवटे यांनी केलेले हे काम महत्त्वाचे आहे. खांडेकरांच्या असंग्रहित वाङ्मयाचा त्यांनी मिशनरी वृत्तीने ध्यास घेतला. खांडेकरांचे वाङ्मय प्रकाशित करावे ही त्यांच्या आंतरिक भावविश्वाची खूण आहे. एका महत्त्वाच्या लेखकाचा हा संचित ठेवा नव्या पिढीसमोर आणावा असे वाटणे यात त्यांची मेहनत आणि सांस्कृतिक उत्तरदायित्वाचे भान दिसून येत आहे. काळाच्या ओघात पुसट होत असलेली खांडेकरांची अक्षरभेट प्रा. सुनीलकुमार लवटे यांनी वाचकांना नव्याने पुनर्भेट करून दिली आहे. याचे श्रेयस आणि प्रेयस त्यांच्या वाङ्मयावरील प्रेमात दडलेले आहे.

(मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे व ग्रंथाली प्रकाशन यांनी प्रा. सुनीलकुमार लवटे यांच्या गौरवार्थ आयोजित केलेल्या समारंभातील भाषण. २९ नोव्हें, २०२५)

**- रणधीर शिंदे**

◆

## वि. स. खांडेकररजतस्मृती वर्षामध्ये प्रकाशित केलेल्या पुस्तकांची सूची

- नवी स्त्री
- भाऊबीज
- स्वप्न आणि सत्य
- सरत्या सरी
- विकसन
- पहिली पावलं
- सशाचे सिंहावलोकन
- साहित्यशिल्पी
- समाजशिल्पी
- जीवनशिल्पी
- अज्ञाताच्या महाद्वारात
- वन्हि तो चेतवावा
- दुसरे प्रॉमिथिअस : महात्मा गांधी
- क्षितिजस्पर्श
- प्रज्ञा आणि प्रतिभा
- साहित्य प्रतिभा : सामर्थ्य आणि मर्यादा
- रानफुले
- अजून येतो वास फुलांना
- मुखवटे
- सांजसावल्या
- ॠतू न्याहाळणारं पान
- स्वप्नसृष्टी
- गाढवाची गीता आणि गाजराची पुंगी
- अंतरीचा दिवा

# पुरस्कार

## ‘दमसा’ ग्रंथ पुरस्कार

दक्षिण महाराष्ट्र साहित्य सभेच्यावतीनं मराठीतील ग्रामीण लेखकांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींना पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मानित करण्यात येतं. २०२५ सालच्या ग्रंथ पुरस्कारांसाठी ‘रवींद्र ठाकूर’ लिखित आणि मेहता पब्लिशिंग हाऊस प्रकाशित ‘दाही दिशा’ या कादंबरीस ‘अण्णा भाऊ साठे’ पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे.

त्याचबरोबर ‘धनंजय बिजले’ यांनाही ‘कृ.गो. सूर्यवंशी पुरस्कार(संकीर्ण)’ या पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलं आहे. मेहता पब्लिशिंग हाऊसने बिजले यांनी अनुवादित केलेलं ‘अण्णा हजारे’ आणि त्यांनी लिहिलेलं ‘लढा लोकपालचा’ ही दोन पुस्तकं प्रकाशित केली आहेत. रविवार, २४ मे, २०२६ रोजी, सकाळी साडेदहा वाजता, शेठ रामभाई सामाणी स्मृती हॉल, शिवाजी उद्यमनगर, कोल्हापूर इथे पुरस्कार वितरण

समारंभ पार पडला.

मेहता पब्लिशिंग हाऊससाठी हा अभिमानाचा क्षण आहे. रवींद्र ठाकूर आणि धनंजय बिजले यांचं मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे अभिनंदन! पुढील वाटचालीस शुभेच्छा!

## महाराष्ट्र साहित्य परिषद पुरस्कार २०२६

**पुणे :** महाराष्ट्र साहित्य परिषद, पुणे यांच्या वतीने दिले जाणारे 'वार्षिक ग्रंथ पारितोषिक' आणि 'विशेष ग्रंथकार पुरस्कार' हे २६ मे, २०२६ रोजी, बालगंधर्व रंगमंदिर, पुणे इथे पुरस्कारार्थींना प्रदान करण्यात आले. यामध्ये ग्रामीण कथाकार प्रा. अप्पासाहेब खोत यांच्या 'अबिरमाती' या कथासंग्रहास वार्षिक ग्रंथ पारितोषिक पुरस्कारांतर्गत 'ग.ल.ठोकळ पुरस्कार' प्रदान करण्यात आला. हा कथासंग्रह मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे प्रकाशित करण्यात आला आहे. ग्रामीण जीवनाचा-रूढी-परंपरांचा वेध घेत शहरी जीवनाच्या चालीरीतींवरही काहीसं भाष्य करणारा हा कथासंग्रह वास्तववादी ठरतो. या कथासंग्रहास सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या बी.ए. भाग - दोनच्या मराठी विषयाच्या अभ्यासक्रमात स्थान मिळाले आहे.

त्याचबरोबर शर्मिला फडके यांच्या 'ये शहर बड़ा पुराना है' या कथासंग्रहासही वार्षिक ग्रंथ पारितोषिक पुरस्कारांतर्गत 'आनंदीबाई शिर्के' हे पारितोषिक देण्यात आलं. मेहता पब्लिशिंग हाऊसतर्फे देण्यात येणारा प्रकाशक सुनील मेहता साहित्य सृजन पुरस्कारही गेल्या वर्षी या पुस्तकास प्राप्त झालेला आहे.

तसेच विशेष ग्रंथकार पुरस्कारांवरही मेहता पब्लिशिंग हाऊसचे लेखक राजेंद्र खेर आणि अनुवादिका शुचिता नांदापूरकर-फडके यांनी आपली मोहोर उमटवली आहे. राजेंद्र खेर राजा फडणीस पुरस्कृत रामाचार्य अवधानी पुरस्काराने पुरस्कृत झाले. तर शुचिता नांदापूरकर-फडके यांना श्रीपाद जोशी पुरस्काराने गौरवण्यात आलं.

मेहता पब्लिशिंग हाऊससाठी हा प्रचंड अभिमानाचा क्षण आहे. सर्व पुरस्कारार्थींचे मनःपूर्वक अभिनंदन!

◆

# श्रद्धांजली

## 'शहाण्यांचा सायकॅट्रिस्ट' कालवश!

**पुणे** - 'शहाण्यांचा सायकॅट्रिस्ट' म्हणून ज्ञात असलेले ख्यातनाम मानसोपचार तज्ज्ञ, लेखक डॉ. आनंद नाडकर्णी



१५ मे, २०२६ रोजी काळाच्या पडद्याआड गेले. मानसिक आजार हा मानवी जीवनातील शारीरिक आजारासारखाच सामान्य आहे, याबाबत डॉ. आनंद नाडकर्णी यांनी अनेकांना जागरूक केलं. मानवी मनाची गुंतागुंत आणि मानसिक आजार याबाबत सामान्यांना समजेल अशा सहज-सोप्या शैलीत लिखाण करणारे; तसेच याच गोष्टीसाठी आपले संपूर्ण आयुष्य वेचणारे आनंद नाडकर्णी सामान्यांच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग होऊन गेले. मराठी लेखक व नाटककार म्हणूनही त्यांची ख्याती होती. त्यांच्या 'गद्धेपंचविशी' आणि 'विषादयोग' या पुस्तकांना महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार मिळाला आहे. नाडकर्णी यांनी 'रंग माझा वेगळा' आणि 'असेच आम्ही सारे' ही व्यावसायिक नाटकंही लिहिली आहेत. त्यांच्या 'मयसभा' या नाटकाला लेखन पुरस्कारही मिळाला होता.

मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केलेल्या आणि प्रख्यात लेखक लक्ष्मण माने यांनी लिहिलेल्या 'अनिल' या अनिल अवचट यांच्या जीवनचरित्राला डॉ. आनंद नाडकर्णी यांची अभ्यासपूर्ण अशी प्रस्तावना लाभली आहे. तसेच सुनंदा अमरापूरकर यांच्या 'खुलभर दुधाची कहाणी' या पुस्तकातही त्यांचा उल्लेख आढळून येतो.

असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व पुन्हा होणे नाही. डॉ. आनंद नाडकर्णी यांना मेहता पब्लिशिंग हाऊसकडून भावपूर्ण श्रद्धांजली!

◆

**नवी संहिता... नवा आशय...**

# हारुन आणि गोष्टींचा समुद्र




**सलमान रुश्दी**

अनुवाद

**वंदना भागवत**

गोष्टींच्या मोहमयी दुनियेची सफर घडवणारी
सलमान रुश्दी यांची अफलातून कादंबरी

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# स्पेअर




**प्रिन्स हॅरी**


अनुवाद

**सुनीता कट्टी**

राजेशाही घराण्याचं वास्तव दाखवणारं इंग्लंडच्या गादीचा राखीव दावेदार
प्रिन्स हॅरीचं खळबळजनक आत्मचरित्र

**किंमत : ९९९/-रु. । पोस्टेज ५०/-रु. । ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## पुस्तकाच्या पानांतून




# द आर्ट ऑफ मॅनेजमेंट

**शिव शिवकुमार**

अनुवाद

**सुप्रिया वकील**

पृष्ठे : २६०
किंमत : ३९९

*व्यवस्थापन... तुमचे,*
*तुमच्या टीमचे आणि तुमच्या उद्योगाचे*

‘जिथून तुमची सुरुवात झाली- तुमचे कुटुंब, तुमचे स्थान इत्यादी ते काही तुमच्या हातात नहते; पण तुमचे अंतिम लक्ष्य काय आहे हे मात्र तुम्हाला नीट माहीत असायला हवे. ते तुमच्या हातात आहे.’

तुमचा प्रवास ही तुम्ही घेतलेल्या निर्णयांची/तुम्ही निवडलेल्या पर्यायांची फलनिष्पत्ती असते. काही निर्णय तुमच्या हातात असतात तर काही निर्णय तुमच्या हातात

नसतात. मी म्हणेन, की ज्या गोष्टी तुमच्या हातात आहेत, त्या बाबतीत तुमची कामगिरी चांगली असायला हवी; त्यामुळे तुमच्या वाटचालीत खूप मोठा फरक पडेल.

विचार करा, कोणत्या गोष्टींवर तुमचे नियंत्रण असते?

पुढे दिलेल्या गोष्टींवर तुमचे पूर्णपणे नियंत्रण असते :

अ. तुमच्या वेळेचे व्यवस्थापन

ब. तुमच्या महत्त्वाकांक्षेचे व्यवस्थापन

क. तुमच्या अध्ययनाचे व्यवस्थापन

ड. तुमच्या ऊर्जेचे व्यवस्थापन

इ. तुमच्या संस्थेशी असलेल्या तुमच्या नात्याचे व्यवस्थापन

आता आपण या सर्व मुद्यांसंदर्भातील माझी निरीक्षणे पाहू -

**तुमच्या वेळेचे व्यवस्थापन**

वेळ हा असा घटक आहे जो आपल्या सर्वांकडे सारख्याच प्रमाणात असतो. काहीजण त्या वेळेचा पुरेपूर वापर करून घेतात; तर काहीजण तो वाया घालवतात. वेळ ही अत्यंत सांस्कृतिक गोष्ट आहे. साहजिकच त्याबद्दलची वृत्ती संस्कृतीवर अवलंबून असते.

कामाचे 'हायब्रिड मॉडेल,' सहकाऱ्यांसोबत संपर्क-संवाद व परिसंस्था या दशकामध्ये तुम्ही वेळेचे व्यवस्थापन कसे करता याला महत्त्व देईल. जे लोक सुस्त-मंद आहेत, जे सतत अंतिम कालमर्यादा हुकवतात; ज्यांना सतत आठवण करून द्यावी लागते. जे मेसेज अथवा ई-मेल्सना उत्तर देत नाहीत अशा लोकांशी आपल्याला सहकारी म्हणून संबंध येणे आवडत नाही.

वेळेचे व्यवस्थापन करण्याचे दोन मार्ग असतात :

१. वक्तशीरपणे (ऑन-टाईम)

२. निश्चित वेळेचा अभाव (फ्लेक्सी-टाईम)

वक्तशीर लोक व संस्कृती सुव्यवस्थित असतात. वक्तशीर लोक वेळेकडे काटेकोर गोष्ट म्हणून पाहतात. ते त्यांचे वेळापत्रक सांभाळतात. त्यांनी एकदा वेळ दिला, की त्यांना अगदी क्वचितच त्याचे पुन्हा स्मरण करून द्यावे लागते तसेच ते तो कार्यक्रम क्वचितच पुढे ढकलतात.

वक्तशीर देश - अमेरिका, डेन्मार्क, स्वित्झर्लंड, जर्मनी, जपान व यूके.

अमेरिका, जपान व स्वित्झर्लंड या देशांत वेळेवर जाणे उशीर

मानला जातो.

वक्तशीरपणाबद्दल ख्याती असणारी शहरे मुंबई, हाँगकाँग, लंडन, न्यू यॉर्क व जिनिहा या शहरांमधील बऱ्याचजणांसाठी वेळ म्हणजे पैसा आहे आणि सर्वजण वेळापत्रकाप्रमाणे काम करतात- तिथल्या व्यवस्थेत वेळेला खूप महत्त्व दिले जाते.

जपानच्या शिनकानसेन बुलेट ट्रेनचा दरवर्षी सरासरी विलंब छत्तीस सेकंदांपेक्षा कमी आहे. हे किती विलक्षण आहे! जर ट्रेनला विलंब झाला तर ट्रेनचा चालक आणि वाहक प्रत्येक प्रवाशासमोर लवून दिलगिरी व्यक्त करतो. जपानमध्ये एक आश्चर्यकारक प्रसंग घडला होता- एकदा तिथे बुलेट ट्रेन निर्धारित वेळेच्या तीस सेकंद आधी सुटली; त्यामुळे ट्रेन कंपनीने सर्वांची माफी मागितली होती.

निश्चित वेळेचा अभाव असलेल्या म्हणजेच 'फ्लेक्सी-टाईम' संस्कृतीमध्ये वेळेकडे प्रवाही गोष्ट म्हणून पाहिले जाते. अशा संस्कृतींमध्ये वेळ ही गोष्ट प्रसंग व व्यक्तीवर अवलंबून असते. या संस्कृतीत उशिरा येणे क्षम्य असते. बरेच आफ्रिकी व आशियायी (त्यात भारतही आहे) देश या प्रकारात येतात.

सन १९५९ मध्ये, मानववंशशास्त्रज्ञ एडवर्ड हॉल यांनी त्यांच्या 'द सायलेंट लँग्वेज' या पुस्तकामध्ये 'वेळ' या गोष्टीबाबत सांस्कृतिक नियम सांगितले आहेत. हॉल यांच्या मते, वेळ शब्दांपेक्षा अधिक सुस्पष्ट संदेश देतो. अशा बऱ्याच संस्कृतींमध्ये वेळ सामाजिक - आर्थिक स्थितीचा निदर्शक असतो.

या देशांमध्ये कोणत्याही कार्यक्रमातील प्रत्येक भाषणामध्ये, मुख्य अतिथी अथवा प्रमुख पाहुण्याने त्याच्या अत्यंत व्यग्र वेळापत्रकातून वेळ काढल्याबद्दल त्याचे/तिचे पुन:पुन्हा आभार मानले जातात. 'हाय-पॉवर डिस्टन्स' संस्कृतीमध्ये (जिथे अधिकारसंपन्न लोक वेगळ्या स्तरावर असतात.) अत्यंत प्रतिष्ठित लोक नेहमी उशिरा येतात आणि त्यांना भेटता येणे हा इतर लोकांसाठी विशेष लाभ असतो.

एकाच प्रकारच्या संस्कृतीत पद्धती व रिवाज वेगवेगळे असू शकतात. दक्षिण भारतातील विवाह सोहळ्यामध्ये विवाहाचा मुहूर्त ही अत्यंत पवित्र बाब असते. मात्र, उत्तर भारतातील विवाह सोहळ्यात विवाहाचा मुहूर्त मागेपुढे

होऊ शकतो.

कोणत्याही कंपनीत आजूबाजूला नजर टाका; तुम्हाला वेळेसंदर्भातील बेशिस्तीच्या या काही खुणा दिसतील :

१. 'बिझिनेस पोर्टल'वर सर्व उद्दिष्टे नोंदवण्याचे काम कधीही वेळेवर पूर्ण झालेले नसते; एचआर टीम्स असंख्य स्मरणपत्रे पाठवत असतात.

२. मूल्यमापनाचे (अप्रेजल) संपूर्ण काम वेळेवर झालेले नसते; काही ठिकाणी तर मूल्यमापनच केले जात नाही.

३. लोकांनी त्यांना दिलेली कामे व प्रक्रिया वेळेवर पूर्ण कराव्यात या दृष्टीने पाठपुरावा करण्यासाठी खाती तयार केलेली असतात.

४. ग्राहक भेट अथवा 'सिस्टिम पार्टनर' भेटींबाबतची टिपणे प्रसारित केली जात नाहीत; तसेच 'बननोट' किंवा तत्सम पद्धतींद्वारे 'डेटाबेस' ठेवला जात नाही.

जे लोक वेळेच्या व्यस्थापनात उत्कृष्ट असतात त्यांना आपण 'हायपर' व्यक्ती म्हणतो.

आता आपण काही लोक वेळेचे व्यवस्थापन चांगल्या पद्धतीने का करू शकत नाहीत याची काही कारणे पाहू :

१. याचे पहिले कारण म्हणजे काही लोक कधीही 'नाही' म्हणू शकत नाहीत. ते आणखी काम मागत राहातात; त्या कामासोबत काय येते हेही त्यांना कळत नाही किंवा त्यांना प्राधान्याचा विषय ठरवता येत नाही. 'बिझी' असणे हा अशा लोकांसाठी 'बिल्ला' असतो.

२. काही लोक परिपूर्णतेचा ध्यास घेतलेले असतात - परफेक्शनिस्ट. त्यांना कोणतेही सादरीकरण अथवा काम अथवा प्रतिसाद अथवा अन्य कोणतीही गोष्ट ११० टक्के बरोबरच असायला हवी असते; अन्यथा त्यांचा वेळ वाया जातो. उद्याच्या जगामध्ये जिथे आणखी माहितीचा ओघ असणार आहे आणि बराच विसर पडणार आहे; तिथे असा परिपूर्णतेचा ध्यास हे पाप ठरणार आहे. कंपनीतील याचे उत्तम उदाहरण सांगायचे तर - वार्षिक नियोजन प्रक्रिया. ज्या गोष्टी कंपन्यांच्या नियंत्रणात नसतात अशा बऱ्याच गोष्टींवर त्या खूप वेळ वाया घालवतात आणि तरीही त्यांना त्याबाबत विशिष्ट दृष्टिकोन किंवा एखाद्या समस्येकडे जाण्याचा मार्ग हवा असतो.

३. दिरंगाई. काही लोक वेड्यासारखे दिरंगाई करतात. प्रत्येक गोष्टीत

त्यांची वीस प्रश्नांची मालिका असते; अमुक घडले तर काय करायचे? तमका माणूस असे म्हणाला तर काय करायचे? त्यांनी जर मान्य केले नाही तर? अशी त्यांची जर-तरची मालिका सुरू असते. तुम्ही प्रश्न विचारू नका असे माझे म्हणणे नाही; पण सतत तेच तेच प्रश्न विचारत राहाण्याने तुमच्या हाती कामाचे काहीच लागणार नाही.

४. परानुभूतीचा अभाव. तुम्ही जेहा इतर लोकांना ताटकळत ठेवता किंवा तुमच्याकडे त्यांच्यासाठी वेळ नसतो तेव्हा त्यांना कशा/कशातून पार व्हावे लागते याबद्दल काही लोकांना जराही सहानुभूती नसते. बऱ्याच पौर्वात्य संस्कृतींमध्ये आपण हे सामान्य म्हणून स्वीकारतो.

५. आळशीपणा. काही लोक आळशी असतात. ते एका वेळी फक्त एकच काम करू शकतात आणि त्यांना आणखी भार घ्यायचा नसतो. असे लोक त्यांच्या कामाबद्दल बोलत असतात; जेणेकरून ते फार काही काम करत नाहीत. मात्र, ही गोष्ट तुमच्या लक्षात येऊ नये यास्तव वेळ काढण्यासाठी ते काम विस्तारतात.

६. सुमार तयारी. आपण सादरीकरणांदरम्यान व भाषणांदरम्यान हे कायम पाहात असतो. व्यवस्थापक त्यांना संबंधित विषयाबद्दल जे जे माहीत आहे ते सगळे त्यांच्या 'स्लाईड्स'मध्ये कोंबतात; त्यामुळे त्यांची स्लाईड पास्ता बाऊलसारखी दिसते. त्याहून भयंकर गोष्ट म्हणजे व्यवस्थापकांना त्यातील प्रत्येक ओळ वाचून - ती समजावून सांगायची असते.

माझी पद्धत म्हणजे- स्लाईडमध्ये 'व्हिज्युअल' आणि एका स्लाईडमध्ये जास्तीतजास्त चोवीस शब्द घेणे.

त्या स्लाईडमध्ये काय आहे यापेक्षा तुम्हाला जे सांगायचे असते ते 'नॅरेटिव' जास्त महत्त्वाचे असते. मी सामान्यतः प्रत्येक स्लाईडला २ ते ३ मिनिटे देतो आणि जर माझे वीस मिनिटांचे सादरीकरण असेल तर मी जास्तीतजास्त ६ ते १० स्लाईड्स घेतो.

कोणत्याही सादरीकरणामध्ये स्लाईड्स दाखवताना तुम्ही काढलेली टिपणे मांडलीत तर तुम्ही वेळेचे व्यवस्थापन उत्तमरित्या करू शकाल. साहजिकच मीटिंगला येताना नीट तयारी करून न आलेले किंवा अजिबातच तयारी करून न आलेले लोक सहज ओळखता येतात.

हा सगळ्यांच्याच वेळेचा अपव्यय असतो, कारण जेव्हा संभाषणाची गाडी

निर्णय घेण्याच्या दिशेने न्यायची असते तेहा सगळ्यांना मूलभूत गोष्टींपासून सुरुवात करावी लागते.

७. पाठपुराव्याचा अभाव. काही लोकांना त्यांच्या सहकाऱ्यांकडून काम कसे करून घ्यायचे ते समजत नाही. त्यांना स्वत:चे काम पूर्ण करण्यासाठी त्या लोकांकडून काम करून घ्यावे लागते. कधीकधी एखाद्या संस्थेमध्ये एकापाठोपाठ एक अशा मालिकेत काम होते. अशा वेळी जर पाठपुरावा केला नाही तर संबंधित लोक वेळेच्या व्यवस्थापनात अगदी सुमार ठरतात. आपले सहकारी आणि वरिष्ठ यांच्याकडे पाठपुरावा करून आपले काम वेळेत कसे पूर्ण करायचे हे तुम्हाला माहीत असले पाहिजे.

८. काम पुढे ढकलण्याची सवय. काही लोक फक्त काम पुढे ढकलत राहातात. अगदी साधी-सोपी, रोजची कामे विनाकारण उद्यावर अथवा पुढच्या आठवड्यावर ढकलण्याकडे त्यांचा कल असतो. एखादे काम अथवा एखाद्या कामाचा भाग त्या त्या दिवशी पूर्ण करण्यामुळे तुम्ही अधिक कामे हातावेगळी करू शकता; त्यामुळे तुम्ही जे काम आज पूर्ण करू शकता, ते काम उद्यावर ढकलू नका.

९. कार्यशृंखलेबाबत सजग नसणे. आपले काम व 'जॉब' एका भय चित्राचा भाग कसे बनतात हे व्यवस्थापकांच्या लक्षात येत नाही; त्यामुळे आपले काम वेळेवर पूर्ण करणे हा कार्यशृंखलेतील एक महत्त्वाचा घटक आहे ही गोष्टही त्यांच्या लक्षात येत नाही.

१०.वेळ वाया घालवणे. बरेच व्यवस्थापक कामाच्या ठिकाणी वेळ वाया घालवतात. ते आपला बराच वेळ रिकामटेकडेपणाने गप्पा-टप्पा करणे, ऑफिसमध्ये फिरणे आणि जो कुणी सापडेल त्याच्यासोबत अविरत चहा/कॉफी ढोसण्यात घालवतात. 'सोशल मीडिया' ही बाब कामाच्या ठिकाणी लक्ष विचलित करून प्रचंड वेळ वाया घालवणारी गोष्ट आहे. काही व्यवस्थापक त्यांच्या कंपनीच्या विषय-पत्रिकेतील गोष्टींपेक्षा सोशल मीडियावर जास्त वेळ घालवतात.

आता आपण वेळेचे व्यवस्थापन उत्तमरीत्या करणारे व्यवस्थापक आणि वेळेच्या व्यवस्थापनाची सवय लावून घेण्यासाठी किंबहुना ती 'सुपर हॅबिट' बनवण्यासाठी ते काय करतात हे पाहू. मला 'युनिलिव्हर' व 'टाटा सन्स'चे आर. गोपालकृष्णन, 'नोकिया'चे ऑली - पेक्का व 'पेप्सीको'च्या इंद्रा नूयी

असे काही वेळेचे खरोखर चांगले व्यवस्थापन करणारे लोक पाहण्याचे भाग्य लाभले आहे.

वेळेचे उत्तमरीत्या व्यवस्थापन करणाऱ्या लोकांकडून मी धडे घेतो, ते असे :

१. हे लोक जे काही करतात ते अत्यंत सुव्यवस्थित करतात. ते वेळापत्रक/ कॅलेंडर ठेवतात आणि त्या वेळापत्रकानुसार वागतात. ते क्वचितच मीटिंग्ज रद्द करतात आणि समजा, त्यांनी मीटिंग रद्द केली तर ते तुम्हाला पर्यायी वेळ देतात; त्यामुळे माझी पहिली 'टिप' आहे : वेळापत्रक व्यवस्थित पाळा.

२. वेळेचे उत्तमरीत्या व्यवस्थापन करणारे व्यवस्थापक मीटिंगला येताना पूर्ण तयारीनिशी येतात. आपण दिवसातला २५ टक्के वेळ मीटिंग्जमध्ये घालवतो. हे असे ठिकाण असते जिथे कामाशी संबंधित घडामोडी होतात; कामाशी संबंधित माहिती दिली जाते व निर्णय घेतले जातात. प्रत्येक मीटिंगसाठी तुम्ही उत्तम प्रकारे सज्ज असणे ही तुम्ही तुमच्या संस्थेला व टीमला देऊ शकता अशी सर्वोत्तम भेट असते.

३. हे लोक भरपूर टिपणे काढतात आणि या टिपणांचा उपयोग त्यांना नंतरच्या मीटिंग्जमध्ये मुद्दे लक्षात ठेवण्यासाठी होतो. वेळेचे उत्तमरीत्या व्यवस्थापन करणारे व्यवस्थापक ज्या प्रकारे रोजनिशी लिहितात, तशी कुणीच लिहीत नसेल आणि याचा त्यांना खूप मोठा फायदा होतो.

४. ज्या गोष्टींची जबाबदारी इतरांकडे देणे शक्य आहे, ती जबाबदारी ते इतरांवर सोपवतात.

५. त्यांनी व्यक्तिश: अथवा त्यांच्या टीमच्या वतीने ज्या गोष्टी कबूल केलेल्या असतील त्या पूर्ण करण्याचा ते प्रयत्न करतात.

६. वेळेचे उत्तम व्यवस्थापन करणारे व्यवस्थापक विरोध दिसताच तो प्रश्न सोडवण्यास अधिक प्राधान्य देतात; ते पर्याय निवडतात.

७. एका वेळी अनेक कामे कधी करायची (मल्टिटास्किंग) आणि कधी टाळायची हे त्यांना माहीत असते. जेव्हा तुमचे संपूर्ण लक्ष चर्चेसाठी घेतलेल्या विषयाकडे असणे आवश्यक असते, तेव्हा 'मल्टिटास्किंग' टाळणेच बरे असते. 'मल्टिटास्कर' लोकांसाठी मेलफोन आणि त्यावरील मेसेजेस ह्या सर्वाधिक लक्ष विचलित करणाऱ्या गोष्टी असतात; त्यामुळे महत्त्वाच्या मीटिंग्ज

व चर्चेच्यावेळी फोन बाजूला ठेवा.

८. त्यांच्या वेळापत्रकात नियमित ‘ब्रेक्स’ असतात. पाय मोकळे करून येण्यासाठी, चहा/कॉफी घेण्यासाठी अथवा ‘मिस्ड कॉल्स’ना उत्तरे देण्यासाठी.

९. ते नेहमी प्रतिक्रिया/प्रतिसाद देतात. ते ई-मेल्स, मेसेजेसना आणि सगळ्या ‘मिस्ड कॉल्स’नादेखील उत्तरे देतात.

१०. वेळेचे व्यवस्थापन अनेक प्रकारे लाभदायक ठरते अशी त्यांची धारणा असते. जर त्यांनी वेळेचे उत्तम प्रकारे व्यवस्थापन केले तर ते ‘सिस्टिम’वर प्रभाव पाडू शकतात आणि तिचे आणखी चांगल्या प्रकारे व्यवस्थापन करू शकतात; त्यामुळे वेळेचे उत्तम व्यवस्थापन करण्याचे एकूणच बहुविध फायदे असतात.

मी सुरुवातीलाच सांगतो - महत्त्वाकांक्षा ही चांगली गोष्ट आहे. महत्त्वाकांक्षा लोकांना, टीम्सना, कंपन्यांना व समाजाला अधिक चांगली कामगिरी करण्याची प्रेरणा देते. एखादी गोष्ट मिळवण्याच्या अथवा साध्य करण्याच्या इच्छेतून महत्त्वाकांक्षेचा जन्म होतो; पण त्यापेक्षाही महत्त्वाची गोष्ट म्हणजे ती महत्त्वाकांक्षा पूर्ण करण्यासाठी हवा चिकाटीचा निर्धार! महत्त्वाकांक्षा हा काही अधिकार नसतो. प्रत्येक माणसाची काहीतरी बनण्याची इच्छा असते; पण त्यासाठी काही करण्याची महत्त्वाकांक्षा नसते. साहजिकच तुम्हाला काय हवे आहे आणि ते साध्य करण्यासाठी तुम्ही काय करू इच्छिता आणि काय करू इच्छित नाही हे स्पष्टपणे जाणून घ्या.

कोणत्याही कंपनीत महत्त्वाकांक्षेची ‘खात्रीशीर’ सुबोध अशी व्याख्या नसते. स्टॉक मार्केट ट्रेडिंग, इन्व्हेस्टमेंट बँकिंग, पत्रकारिता, कार रेसिंग यांसारख्या काही व्यवसायांमध्ये महत्त्वाकांक्षा अतिशय तीव्र असते तर काही व्यवसायांमध्ये अथवा उद्योगांमध्ये तुम्हाला अतिमहत्त्वाकांक्षा पाहायची नसते. उदाहरणार्थ - डॉक्टर्स, पोलीस, कायद्याचे रक्षक इत्यादी.

सर्वच कंपन्यांना महत्त्वाकांक्षी कर्मचारी हवे असतात असे म्हटले तर ते चुकीचे ठरणार नाही. याचाच अर्थ कंपन्यांना त्यांच्या उद्दिष्टांच्या दृष्टीने लाभदायक ठरण्यासाठी कामे व आव्हाने वेळेआधी पूर्ण करून हवी असतात. कंपन्या अत्यंत कार्यक्षम कर्मचारी, महत्त्वाकांक्षा या गोष्टी समान मानतात. (कधीकधी त्याच्या उलटही)

महत्त्वाकांक्षा जर अनिर्बंध असेल तर त्याचे भयंकर परिणाम घडू शकतात - एन्रॉन, बारिंग्ज आणि काही स्टार्ट-अप्सच्या बाबतीत घडले तसे. ॲरिस्टॉटलचे एक वचन सांगितले जाते - माणसाची महत्त्वाकांक्षा हे अनेक अन्यायांचे मूळ कारण असते.

अतिमहत्त्वाकांक्षा करिअरचे व कामाच्या ठिकाणी असलेल्या संबंधांचे नुकसान करते हे मी पाहिले आहे आणि त्याची परिणती अपयशात होते. मी माझ्याबरोबरचे असे काही लोक पाहिले आहेत जे कामाच्या ठिकाणी असह्य होते; ते त्यांची महत्त्वाकांक्षा अगदी उघड दाखवायचे आणि निमित्ताला टेकल्यासारखे त्यांच्या ग्रूपला घालूनपाडून बोलायचे. त्यांच्यापैकी बरेचजण सीईओ या पदापर्यंत पोहोचले नाहीत याचा मला आनंद आहे, कारण तसे घडले असते तर कोणत्याही कंपनीत त्यांनी यशस्वी नेत्याचा चुकीचा आदर्श घालून दिला असता.

उद्याच्या अनिश्चित जगात जिथे कुठले स्वच्छ - स्पष्ट मार्ग व सहजसोपी उत्तरे असणार नाहीत, तिथे महत्त्वाकांक्षा कशा स्वरूपाची असेल?

मला वाटते, उद्याच्या जगात महत्त्वाकांक्षा थोडी सौम्य व मर्यादित असेल, कारण यशही जलद मिळेल व अपयशही जलद मिळेल आणि हे चक्र अत्यंत गतीने फिरेल.

व्यक्ती जशा महत्त्वाकांक्षी असतात तशाच कंपन्याही महत्त्वाकांक्षी असतात. तुम्ही जर भारतामध्ये कंझ्युमर इलेक्ट्रॉनिक्स ट्रेड पार्टनर्सशी बोललात तर ते तुम्हाला सांगतील, की सॅमसंग आणि एलजी या अत्यंत धडाडीच्या व प्रचंड महत्त्वाकांक्षी कंपन्या आहेत. इंटरेस्टिंग गोष्ट अशी, की या ट्रेड पार्टनर्सना ते या कंपन्यांच्या जीवावर जे पैसे मिळवतात ते आवडते; पण या कंपन्यांच्या महत्त्वाकांक्षेचे व धडाडीचे स्वरूप पाहता, ते या कंपन्यांवर विश्वास ठेवण्याच्या बाबतीत डळमळीत असतात.

महत्त्वाकांक्षी माणसावर विश्वास ठेवणे लोकांना अवघड वाटते, कारण असा माणूस त्याच्या वाटचालीत आपला 'प्यादे' म्हणून वापर करील असे त्यांना वाटते.

लीडर्स माणसांमध्ये व टीममध्ये महत्त्वाकांक्षा जागवण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. आपण कितीतरी वेळा ऐकले आहे, की ते लोकांना सांगतात, ''हे तुम्ही पूर्वी केलेलं आहे. आपण हे केलेलं आहे. आता आपण

हे पुन्हा करू या.'' अशा प्रकारच्या उपदेशाचा उपयोग होतो; पण ठरावीक मर्यादेपर्यंतच.

माझ्या मते अत्यंत संतुलित महत्त्वाकांक्षी व्यक्ती व कंपनी या दोघांसाठीही चांगली असते. अत्यंत संतुलित महत्त्वाकांक्षेतून सर्जनशीलता आणि नवोपक्रम, अधिक उत्तम कार्यक्षमता, उत्तम टीमवर्क आणि कामाचे अधिक समाधान लाभते.


अत्यंत संतुलित महत्त्वाकांक्षा म्हणजे व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपेक्षा कंपनीच्या अथवा टीमच्या महत्त्वाकांक्षेला अधिक महत्त्व देणे, नुसत्या पोकळ घोषणांचा आधार घेण्याऐवजी ज्ञानसंपादन आणि क्षमता निर्माण करण्याद्वारे प्रगती साधणे; यशाकडे सरळ नजरेने पाहणे आणि अपयशाकडे काणाडोळा न करणे किंवा ते झाकण्याचा प्रयत्न न करणे.

काही ठिकाणी महत्त्वाकांक्षा तीव्र निर्धारातून निर्माण होते. न्यूझीलंडचा क्रिकेट संघ नेहमी कमी लेखला जाणारा; पण अपेक्षेपेक्षा चांगली कामगिरी करणारा संघ आहे. त्यांची फारशी महत्त्वाकांक्षा दिसत नाही; पण न्यूझीलंडच्याच 'ऑल ब्लॅक्स' या रग्बी संघाचे याच्या अगदी उलट आहे. हा अत्यंत यशस्वी संघ प्रत्येक सामन्याआधी 'माओरी' (न्यूझीलंडमधील मूळ रहिवासी) लोकांचे 'हाका' हे पारंपरिक नृत्य करून प्रतिस्पर्ध्यांचे मनोबल खच्ची करण्याचा प्रयत्न करतो. या दोन्ही मार्गांचा उपयोग होतो!

जेव्हा तुम्ही महत्त्वाकांक्षी मार्गावर वाटचाल करू लागता तेव्हा तुम्ही काही क्षमतांचा विचार करणे आवश्यक असते. तुम्ही जेवढा वेळ कामावर असता तो वेळ महत्त्वाकांक्षेसाठी मारक ठरू शकतो; कारण व्यवस्थापक नव्या गोष्टींचा प्रयोग करून पाहणे आणि नव्या महत्त्वाकांक्षा ठेवणे यापेक्षा कोणत्या मार्गाचा उपयोग झाला आहे यावर भिस्त ठेवतात.

◆

# पुस्तकाच्या पानांतून




## ब्रेड, सिमेंट, कॅक्टस

**ॲनी झैदी**

अनुवाद

**सुनंदा अमरापूरकर**

पृष्ठे : १८४
किंमत : २९५

*स्थलांतरितांच्या जगण्याची कारणमीमांसा करणारं, अंतर्मुख करणारं अनुभवकथन*

**जिवंत राहणाऱ्यांवर खटला भरण्यात येईल!**

त्या जागेबद्दलच्या माझ्या पहिल्या काही आठवणींमध्ये 'निवडुंग' आहे. आणि दुसरं आहे चाळलेल्या वाळूच्या ढिगावर खेळणं. ती वाळू नंतर काँक्रीटमध्ये मिसळण्यासाठी तिथं पडून असे.

कॉलनी हा शब्द भारतात औद्योगिक वसाहत आणि शहरातील निवासी संकुलाच्या समूहासाठी वापरला जातो.

आमची कॉलनी अगदी रुक्ष आणि धुळीने भरलेली होती. उन्हाळ्यात तापमान पन्नास अंश सेल्सियस पर्यंत जाई. कॉलनीच्या एका बाजूला अरवली पर्वत होता. ह्या जगातल्या सर्वांत पुरातन पर्वत रांगा आणि दुसऱ्या बाजूला सिमेंट फॅक्टरी.

कॉलनीतल्या प्रत्येकाला आपापली जागा बरोबर माहिती असे. फॅक्टरीमधल्या कामाच्या दर्जाप्रमाणे घरं दिली जात. सर्वोच्च अधिकाऱ्यांसाठी 'ए' टाइप क्वार्टर होते. हे मोठे आलिशान बंगले असून पुढे बगीचा आणि माळीसुद्धा फॅक्टरीचाच असे. त्या खालच्या अधिकाऱ्यांना 'बी' टाइप आणि त्या खालच्यांना 'सी'टाइप क्वार्टर मिळत. जे फॅक्टरीत निळा गणवेश घालून काम करीत ते 'ई' आणि 'एफ' टाइपमध्ये राहत. आम्ही 'डी' टाइपमध्ये होतो. जे अधिकारी नाहीत, परंतु अगदी कामगारसुद्धा म्हणता येणार नाहीत, त्यांच्यासाठी या 'डी' टाइप क्वार्टर होत्या. माझ्या आईसारख्या लोकांसाठी. ती फॅक्टरीत काम करणाऱ्यांच्या मुलांसाठी असलेल्या शाळेत पहिल्यांदा उपमुख्याध्यापक आणि नंतर मुख्याध्यापक होती.

मॅनेजर आणि भट्टीवर काम करणारे कामगार, या दोघांचीही मुलं त्याच शाळेत जात. अगदी सहा वर्षांच्या मुलांनाही ए, बी, सी, डी म्हणजे काय ते बरोबर समजत असे. 'डी' टाइप म्हणजे दाटीने बांधलेली दोन बेडरूमची घरं. खिडक्यांना उभे गज बसवलेले, कापलेल्या फळ्यांची दारं आणि अगदी बाथरूमच्या जमिनीपर्यंत सगळीकडे कॉंक्रीटचा वापर. संगमरवर नाही, काचा नाहीत, टाइल्स नाहीत, की बगीचा नाही. माझ्या आईला जेव्हा बढती मिळाली, तेव्हा 'ई' टाइपमधल्या माझ्या एका मैत्रिणीने विचारलं, 'आता काय बाई, तू तर सी टाइपमधल्या मैत्रिणींबरोबर फिरणार. हो ना?'

त्या वेळेला मला माहिती नहतं, की 'डब्ल्यू' आणि 'एल सी' टाइपच्या सुद्धा क्वार्टर होत्या. अनुक्रमे वॉचमन आणि हमालांसाठी. पण तिथं राहत असताना अकरा वर्षांत मी एकदाही त्या क्वार्टर बघितल्या नाहीत.

रस्ते सगळे कॉंक्रीटचे होते. सिमेंट ही एक गोष्ट त्या वसाहतीत कधीच कमी पडत नसे. पण त्या रस्त्यांवर वाहतूक अशी नसायचीच. फक्त उच्च अधिकाऱ्यांच्या मोटारी होत्या आणि काही जण स्कूटर वापरीत. बाकी आम्ही सर्वजण चालतच जात असू आणि तसं कुठं जायला ठिकाण नहतंच. सिनेमा टॉकीज नाही, रेस्टॉरंट नाही, अगदी आवश्यक वाणसामानाखेरीज कसली

खरेदी नाही, कॅफे नाही, पोहण्याचा तलाव नाही, पुस्तकाचं दुकान नाही, बस नाही की टॅक्सी नाही.

जर कधी तुम्हाला कॉलनीच्या बाहेर जायचं असलं, तर एक फॉर्म भरून द्यावा लागे आणि कार आणि ड्रायव्हरची मागणी करावी लागे. 'सिरोही' हे जिल्ह्याचं ठिकाण एका तासाच्या अंतरावर होतं. तिथं एक हॉस्पिटल होतं. एकदा माझ्या पायाला गंभीर फ्रॅक्चर झालं होतं, तेव्हा तिथं मला भरती केलेलं होतं. आणि त्यावेळी जणू माझ्या पायाचा वापरच हरवला होता. सिरोहीला शिंप्याची दुकानं आणि बेकऱ्याही होत्या. माझ्या वाढदिवशी रहस्यमय रीतीने घरी येणारे केक तिथूनच येत. सिरोहीला एक रेल्वे स्टेशन होतं. तिथून वर्षातून दोनदा आम्ही आजोळी जाण्याकरता आगगाडी पकडत असू.

जर प्रत्यक्षात कॉलनी न सोडता तुम्हाला कधी तिथून लांब जावंसं वाटलं, तर एकमेव जागा म्हणजे अरवली पर्वतांतल्या टेकड्या. अत्यंत पुरातन, स्थितप्रज्ञ आणि कधीही पूर्णपणे वसाहतीत सामील न झालेल्या या टेकड्या म्हणजे खरं तर सिमेंट फॅक्टरी अस्तित्वात येण्याचं कारण होत्या. सुरुंगाचे स्फोट घडवून तिथल्या चुन्याचे थर मोकळे केले जात. ज्या दिवशी स्फोट होणार असेल, त्या दिवशी टेकडीकडे न फिरकण्याची आम्हाला ताकीद देण्यात येई. आम्हाला कधी सुरुंग बघायला मिळाले नाहीत, पण अधूनमधून स्फोटाचे आवाज दुरून ऐकायला मिळत.

कधी कधी आम्ही कॉलनीजवळच्या टेकडीवर चढून जायचो. बरोबर सँडविचेस असायची. ती आमची पिकनिक. वर पोचल्यावर एक टोकदार गारगोटी घेऊन, तिथल्या सपाट खडकावर आम्ही आमची नावं कोरायचो. त्या निळसर पांढुरक्या खडकावर पांढऱ्या अक्षरातलं माझं नाव बघून मला फुटकळ समाधान मिळायचं. वाटायचं, 'मी आहे. जिवंत आहे. पण कंटाळा आल्यामुळे इथं केव्हाही माझा मृत्यू होण्याचा धोका आहे.'

ज्या टेकड्या कॉलनीतून दिसत नसत, तिकडे न जाण्याची आम्हाला सक्त ताकीद दिलेली होती. तिकडे भिल्ल आदिवासींच्या टोळ्या राहत. ते लहान मुलांच्या अंगावरचे दागिने काढून घेतात अशा गोष्टी आम्ही ऐकलेल्या होत्या. कॉलनीमध्ये भुरट्या चोऱ्याही होत असत. कुणाचे वाळत घातलेले कपडे चोरीला गेले, कढवून ठेवलेली तुपाची बरणी किचनमधून उचलून नेली, आणि हायवेवर दगड आडवे टाकून येणारी गाडी लुटली अशा प्रकारच्या

बातम्या कानावर येत असत.

मला काही दर वेळी त्या गोष्टी खऱ्याच वाटत नसत. तरीही टेकड्यांच्या पहिल्या रांगेपलीकडे जाण्याचं धाडस मला करायचं नसे. आपल्यावर कुणी हल्ला केला किंवा आपले कानातले काढून नेले, यापेक्षा सुद्धा तो भूभागच तितका भीतिदायक होता. टेकडीमागे टेकडी आणि पलीकडे अजून एक टेकडी. एकही आत्मा नजरेला पडत नसे.

कॉलनीमध्ये सगळं काही फॅक्टरीच्या भोवती फिरत असे. प्रत्येक शिफ्टच्या वेळेला मोठा भोंगा वाजवून सूचना दिली जाई आणि त्या त्या शिफ्टचे कामगार घाईघाईने कामावर जाताना दिसत. कधी तरी सिमेंटने भरलेला ट्रक जोरात निघून जाई.

तिथं येणारा प्रत्येक जण हा बाहेरून आलेला, ज्याला नोकरीची गरज आहे, असा असे. आणि दुसरी चांगली संधी येताच नोकरी सोडून जात असे. फॅक्टरीत नोकरी करणारे आणि त्यांचे नातलग यांच्याखेरीज कुणालाही वसाहतीत येण्याची परवानगी नहती. कॉलनी फाटकाच्या आत संरक्षित होती. आम्ही कधीही केवळ दोन किलोमीटर अंतरावर गावात राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या किंवा मेंढपाळांच्या मुलांमध्ये मिसळलो नाही.

अशा प्रकारची वसाहत म्हणजे काम आणि नियम यांचंच राज्य असतं. तिथं तुमचं पोट भरतं. पण पाय रोवता येत नाहीत. तुमची इच्छा असेल तरी इथं तुम्हाला स्थावर मालमत्ता विकत घेता येत नाही. समजा तुम्ही अशा प्रकारची व्यक्ती असाल, की तुम्हाला औद्योगिक वसाहतीतलं जीवन खूपच आवडत असेल, तरी तुम्ही त्यावर हक्क नाही सांगू शकत. दुसऱ्या बाजूला ज्यांच्या मालकीची इथं जमीन होती, ते आता कुठं दिसतच नाहीत. ही फॅक्टरी तयार होण्याच्या आधी इथं काय होतं किंवा कोण राहत होतं, याबद्दल कधीही कुणी काही बोलल्याचं आठवत नाही. इथं अगोदर काहीच नव्हतं असं समजतच मी लहानाची मोठी झाले आणि ही गोष्ट खरी वाटणं अगदी साहजिक होतं. कारण आजूबाजूला भरपूर निवडुंग आणि बाभळीची झाडं असल्यामुळे वाळवंटाचाच भास होत असे. पण त्या शिवाय तिथं मक्याची शेतं, मेंढ्या, गुरं-ढोरं आणि काही उंटही होते.

कधी कधी आम्हाला पांढरी धोतरं आणि पागोटी घातलेले पुरुष आणि भडक रंगाचे घागरे घातलेल्या बायका दिसत. जेव्हा शाळेसाठी एखादी नवी

इमारत बांधायची असेल किंवा एखादा रस्ता वाढवायचा असेल, त्या वेळी ते दिसत आणि मी नवलाने बघत बसायची. मुलींच्या अंगावर ठळकपणे उठून दिसणारं गोंदण, केसांना लावलेल्या डझनावारी पिना; तर पुरुषांच्या कानात दागिना घातलेला आणि पुढच्या बाजूला पुष्कळ नाड्या बांधलेले कुडते. हळू हळू त्या लोकांच्या टोळ्या मला वेगवेगळ्या ओळखता येऊ लागल्या. गरासिया, रबाडी, भिल्ल.

रबाडी हे पारंपरिक जनावरं पाळणारे लोक. ते आम्हाला दुधाचा पुरवठा करीत. गरासिया हे शेतकरी होते. कॉलनीमध्ये रोजंदारीवर कामासाठी येत. त्यांची मुलं शाळेत जात नहती. पण काहींची किशोरवयीन पोरं घरकामात मदत करायला कॉलनीतल्या रहिवाशांकडे येत असत. त्यासाठी त्यांना रोज किती अंतर चालून यावं लागायचं ते आम्हाला माहिती नहतं. आमच्यापैकी कुणालाच त्यांच्या भाषा येत नव्हत्या. ते जे काही बोलायचे, त्याला भाषा म्हणून सरकारी मान्यता नहती. ती फॅक्टरी, तिथली शाळा आणि सर्व टाइपच्या रहिवासी क्वार्टर्स, या आजूबाजूच्या खेडेगावात राहणाऱ्या आदिवासी लोकांनीच बांधलेल्या होत्या.

खूप कमी लोकांनी जे. के. पुरम विषयी ऐकलं असेल. जर कुणी इथे नोकरी केली असेल किंवा कुणाचे नातलग तिथं कामाला असतील तरच. राज्याच्या बाहेरच्या लोकांनी तर ज्या सिरोही जिल्ह्यात ही वसाहत आहे, त्याचं नावही ऐकलेलं नसतं.

आमच्या जवळचं नाव घेण्यासारखं ठिकाण म्हणजे 'माउंट अबू' हे थंड हवेचं ठिकाण. एके काळी इथं इंग्रज सरकारचं प्रादेशिक व्यवस्थापन केंद्र होतं. सध्या पश्चिम भारतातलं एक परवडण्यासारखं मधुचंद्राचं ठिकाण म्हणून ते लोकप्रिय आहे.

या माउंट अबूला आम्ही शाळेच्या सहलींना जायचो. पिकनिकला जायचो. आणि हायस्कूलच्या वार्षिक परीक्षेलाही जायचो. तिथं पिकनिकसाठी बरीच सुंदर सुंदर ठिकाणं होती. पण माझं आवडतं ठिकाण होतं ट्रेहर्स टँक. ते मला आवडायचं कारण तिथं लावलेला एक सूचनाफलक. त्यावर लिहिलेलं होतं : SWIMMING STRICTLY PROHIBITED. SURVIVORS SHALL BE PROSECUTED. याचा अर्थ पोहण्यास सक्त मनाई आहे.

यातून वाचलेल्या व्यक्तीवर खटला भरण्यात येईल.

मला हे फार विनोदी वाटायचं. म्हणजे मरण्यापासून वाचायचं कशाला? तर खटला भरून घेण्यासाठी? मी फार लहान होते. जिवंत राहण्यासाठी, जगण्या-वाचण्यासाठी लोक काय काय करतात किंवा काय काय करायची त्यांची तयारी असते हे समजण्याचं माझं ते वय नहतं. खासगी मालमत्ता किंवा कायदेशीर मालकीचं पाणी किंवा जमीन म्हणजे नेमकं काय हे मला नीट समजत नहतं. पण हे मात्र नीट माहिती होतं, की PROSECUTED म्हणजे पोलीस पकडून नेतील आणि तुरुंगात टाकतील. खरोखर तुरुंग म्हणजे काय असतं ते मी फक्त सिनेमातच पाहिलेलं होतं. मला वाटायचं तुरुंग म्हणजे जिथं सगळे सारख्या कपड्यात असतात आणि सुटून जायचा विचार करतात ती जागा.

मलाही सुटून जायचं होतं जे. के. पुरम मधून. तिथल्या एकसुरीपणा पासून, त्या भोंग्याच्या आवाजापासून आणि तिथं बंदिस्त केलेल्या सगळ्या काटेरी वस्तूंपासून.

मी मोठी झाल्यावर त्या कॉलनीकडे पाहू लागले, तेव्हा मध्ये वीस वर्षं गेली. जे पूर्वी इथे राहत होते आणि फॅक्टरी बंद झाली तरी इथंच असतील अशा माणसांशी मला बोलायचं होतं. परंपरेने ज्या जमिनीला ते आपली समजत होते, तिच्यातून बाहेरचे लोक नफा कमवू लागले, त्या बाहेरून आलेल्या लोकांशी त्यांचे संबंध कसे असतील?

बसंतगढ खेड्यात माझी ओळख वाघतारामशी करून देण्यात आली. दुसऱ्या कार्यकर्त्याने माझे प्रश्न गरासिया भाषेत समजावून दिले, तेव्हा तो लक्षपूर्वक ऐकत होता. मग एकदम आपले सिमेंटने माखलेले हात हवेत उडवत तो उत्तेजित होऊन तावातावाने बोलू लागला. मला मध्येच सांगावं लागलं, 'कृपया हिंदीत बोला.'

तो हिंदीत सांगत होता.. 'ह्या ह्या हातांनी सगळं बांधलं आहे. सगळ्या जुन्या इमारती. ती फॅक्टरी, ते..'

'सावकाश बोला सावकाश!' मला म्हणावंच लागलं. 'पहिल्यापासून सुरुवात करा'..तो सांगू लागला, 'आता जिथं जे. के. पुरम आहे, त्या जमिनीवर सुरुवातीला वीस गरासिया कुटुंबं राहत होती. सगळे मिळून साधारण दीडशे बिघे जमीन कसत होते. तसा तर दक्षिण आशियामध्ये बिघा म्हणजे

निश्चित असं माप नसतं. एक तृतीयांश एकरापासून एक एकरापर्यंत ते कितीही असू शकतं.'[१]

एव्हाना आजूबाजूला तरुण जमा झाले होते. त्यातला कुणी तरी बोलला, 'ती एक हजार बिघे जमीन होती.' वाघतारामने तत्परतेने बोलणाऱ्याला गप्प केलं. तो म्हणाला, 'मी खोटं बोलणार नाही. ती जमीन दीडशे एकरच होती.'

त्या जागेवर शासकीय संस्था किंवा सवलती अजिबातच नव्हत्या असं नाही. तो आता साधारण सत्तर वर्षांचा होता. त्याला आठवलं, की तो लहान असताना त्या गावात एक शाळा होती. तो आठवीपर्यंत शिकलेला होता. त्यातली पहिली पाच वर्षं त्यांची शाळा एका झाडाखाली भरत असे. वर मोकळं आभाळ दिसायचं. सन१९७०च्या दशकात सुरुवातीला, म्हणजे तो २० ते २५ वर्षांचा असताना ती जागा एक नवी फॅक्टरी बांधण्यासाठी ताब्यात घेण्यात आली. ताब्यात घेण्याच्या कराराचा एक भाग म्हणून, कंपनीने प्रत्येक कुटुंबातील एका पुरुषाला कायम नोकरी देण्याचं आश्वासन दिलं. जमीन नाममात्र किमतीत विकत घेण्यात आली, कारण त्या काळात त्यांच्यापैकी कुणालाही, ती जमीन किती किमतीची आहे याची माहिती नहती. त्यांना हेही माहिती नहतं, की या जमिनीची निकड त्यातल्या चुनखडीच्या साठ्यासाठी करण्यात आलेली होती.

फॅक्टरीत ज्यांना नोकऱ्या मिळाल्या त्यांपैकी तेरा जणांची नावं वाघताराम सांगू शकला. बहुतेकांना पॅकिंग आणि मायनिंग विभागात नोकऱ्या मिळाल्या. तो स्वत: वीस वर्षांपेक्षा जास्त काळ मजुरांचा ठेकेदार आणि बांधकाम मजूर म्हणून काम करत होता. सुरुवातीला तर त्याला रोज केवळ पाच रुपये मजुरी मिळत होती. गवंड्याला सगळ्यांत जास्त म्हणजे नऊ रुपये रोज मिळायचा. जशी वर्षं उलटली तसा पगार काढला. पण एक गोष्ट कायम राहिली. वसंतगढच्या एकाही कामगाराला कॉलनीत राहण्यासाठी क्वार्टर देण्यात आली नाही. त्यांना सांगण्यात आलं, की ज्यांना गरज आहे, त्यांनाच क्वार्टर मिळतील. म्हणजे अर्थातच बाहेरून आलेल्यांना. आजूबाजूच्या खेड्यांतून येणारे कामगार दोन ते पाच किलोमीटर अंतर चालून येत आणि जात. ज्या मुलांचे वडील फॅक्टरीत काम करत नव्हते, त्यांना कॉलनीच्या शाळेत प्रवेश दिला जात नसे.

नाराजी सावकाश का होईना पण कमी झाली. पण आता सगळं सुरळीत


झालं आहे. प्रवीण सिंग राव नावाचा तरुण मध्येच येऊन बोलू लागला. तो सांगत होता, की त्याचे वडील आणि काका २०१९ मध्ये निवृत्त होणार आहेत. सुरुवातीला ज्या मूठभर लोकांना 'कायम' नोकऱ्या मिळाल्या त्यात ते होते. पण प्रवीणला माझी आई शिकवत होती त्या शाळेत प्रवेश घेता आला नाही. ती चांगली शाळा होती. तिथं इंग्रजी माध्यमात शिक्षण दिलं जाई. पण इतक्या लहान मुलाला इतक्या लांब रोज चालत येणं शक्य नहतं, म्हणून त्याला तिथं शिकता आलं नाही. पण पुढे त्याच्या लहान भावंडांसाठी कुटुंबाने काही त्याग केला. दुसऱ्या एका माणसाला फॅक्टरीने क्वार्टर दिली होती. पण तो दुसरीकडे राहायला गेला आणि त्याने क्वार्टर भाड्याने दिली. तिथे प्रवीणचं कुटुंब राहू लागलं आणि तो माणूस गावातून मोटरसायकलवर फॅक्टरीत येऊ लागला.

माणूस जितका जास्त पैसेवाला असेल, तितकी त्याच्याकडे जास्त संसाधनं येतात, मग तो आणखी जास्त पैसे कमावू लागतो. त्याची मुलं चांगलं शिक्षण घेतात. यापुढे तो कामाच्या जागेपासून जवळ राहत नाही, याचं त्याला काहीच वाटत नाही. हा धडा शिकल्यामुळे प्रवीण चिडलेला होता. त्याच्या रागाची आणखीही कारणं होती. चुन्याचे थर काढण्यासाठी डोंगरात जे स्फोट केले जात, त्यामुळे आजूबाजूच्या खेडुतांच्या घराच्या भिंतींना भेगा पडलेल्या होत्या. पश्चिम बनास नदीवर एक धरण बांधलेलं होतं. त्यातून औद्योगिक वसाहतीला भरपूर पाणीपुरवठा केला जाई. त्यामुळे शेतकऱ्यांच्या जमिनीला अपुरा पाणी पुरवठा होई. त्यांना पिण्याकरता आणि घरगुती वापरासाठी टँकरचं पाणी विकत घ्यावं लागे.

वाघतारामने सांगितलं, की आपण आता जे. के. ग्रुपसाठी काम करणं सोडून दिलं आहे. कारण एकदा असं झालं, की त्याचा एक भाचा, बांधकामाच्या ठिकाणी काम करत असताना मरण पावला. तेव्हा त्याने नुकसानभरपाईकरता कंपनीवर खटला भरला. पण त्यात तो हरला. तेव्हापासून त्याला पुन्हा कधी जे. के. ग्रुपसाठी काम करावं असं वाटलं नाही. त्या वेळी त्याचे हात सिमेंटने भरलेले होते, ते त्याच्या गावातल्याच एका बांधकामामुळे. गावात त्याची थोडी जमीन आहे. तिथं तो मका आणि भरड धान्याची पिकं काढतो.

◆

## पुस्तकाच्या पानांतून




# चुंबन

**तसलिमा नासरिन**

अनुवाद

**मंजिरी धामणकर**

पृष्ठे : २६८
किंमत : ४१०

*स्त्रीजीवनाचे अनेक कंगोरे मांडत अस्वस्थ करणाऱ्या तसलिमा नासरिन यांच्या लघुकथा*

### अंतहीन यात्रा

मी मूळची नालंदाची. हिल्सामध्ये घर. माझे बाबा नालंदा विद्यापीठाचे टूरिस्ट गाइड होते. सुमारे दीड हजार वर्षांपूर्वी हे विद्यापीठ स्थापन झाले असे ऐकिवात आहे. तेव्हा तिथे दोन हजार शिक्षक आणि दहा हजार विद्यार्थी होते. बाबांनी आम्हाला विद्यापीठ, बौद्ध विहार, सगळे दाखवले होते. दाखवता दाखवता त्याचा इतिहास

सांगितला होता. बाबा जेव्हा इतिहास सांगायचे, तेव्हा ऐकत राहावेसे वाटायचे. माध्यमिक परीक्षा दिल्यावर माझे लग्न झाले. आमच्याच शाळेतील रंजन मास्तरांशी माझे लग्न झाले. नालंदातच सासर. तीन वर्षे संसार केल्यावर रंजन मास्तरांना मी आवडेनाशी झाले. दुसऱ्या एका विद्यार्थिनीवर त्यांचे मन जडले. का नाही जडणार? 'मुलगा हवा, मुलगा हवा' म्हणून मास्तर महाशय अस्वस्थ होते. आणि मला मात्र झाली मुलगी. मला घटस्फोट देऊन त्यांनी, जिच्यावर मन जडले होते, तिच्याशी लग्न करून तिला घरी आणले. अपरिहार्यपणे मी पुन्हा माहेरी. बरोबर माझी दीड वर्षांची मुलगी - भावना. माझ्या तिथे असण्याने आई-बाबांचे घर जणू उजळले. माझा आणि आईचा वेळ भावनाला वाढवण्यात, स्वयंपाक आणि घरातली इतर लहान मोठी कामे करण्यात जायचा. बाबा गाइडच्या कामात.

एके दिवशी मी आपणहूनच बाबांना म्हटले, 'तुम्ही माझी पाठवणी केलीत, पण मी पुन्हा माघारी आले, तुमच्यावर भार टाकला. तोसुद्धा माझा एकटीचा नाही, तर माझ्या मुलीचादेखील.' बाबा हसून म्हणाले, 'हे काय फक्त आमचे घर आहे का? तुझेही आहेच. इथेच जन्मलीस, वाढलीस. तीन वर्षे इथे नव्हतीस म्हणून आम्ही परके झालो का?'

माझ्या जन्मानंतर माझ्या आईला तीन मुले झाली होती - तिन्ही मुलगे. पण कसे कोण जाणे, खूप ताप येऊन तिन्ही मुले वारली. वस्तीतल्या डॉक्टरांना बोलावूनही काही फायदा झाला नाही. 'ताप का आला, मुले कशी गेली?' या सगळ्या प्रश्नांच्या उत्तरादाखल डॉक्टरांनी फक्त छताकडे, पर्यायाने ईश्वरेच्छेकडे बोट दाखवले.

आई, बाबा आणि मी -आम्ही सुखासमाधानाने राहत होतो. आम्ही काही श्रीमंत नव्हतो, काही अभाव नक्कीच होते, पण खरेच सांगते, आमच्याकडे काहीतरी कमी आहे अशी भावना नव्हती. सोन्याचे डूल करून पाहिजेत, किंवा एखादी भागलपुरी टसर साडी पाहिजे म्हणजे पाहिजेच, अशा माझ्या काहीही मागण्या नव्हत्या. आम्ही भात-भाजी खाऊन हसत-खेळत आयुष्य कंठू शकत होतो.

गाइडचे काम वर्षभर नसायचे. उन्हाळ्यात नालंदातील एका वाचनालयात बाबा काम करत. दोन्ही कामांतून जे उत्पन्न मिळायचे, ते आम्हाला खायला-ल्यायला पुरेसे होते. त्याशिवाय स्वतःचे घर, स्वतःच्या बागेतला भाजीपाला!

त्यामुळे अनेक खर्च वाचायचे. अधून-मधून काही कार्यक्रम-समारंभासाठी नातेवाईकांच्या घरीदेखील आमचे जाणे-येणे हायचे. आम्ही ट्रेनने पाटणा, बेगुसाराई, रांची अशा ठिकाणी जात असू.

एके दिवशी बाबा म्हणाले, ‘तू कॉलेजचे शिक्षण घेऊ शकतेस.’ खरेच की, मी कॉलेजचे शिक्षण घेऊच शकते. उदासिन कॉलेजमध्ये प्रवेश घेतला की एक ना एक दिवस पास होऊन नक्की बाहेर पडेनच, एखादी चांगली नोकरीही मिळू शकेल. मी कॉलेजला जावे असे आईलाही वाटत होते. फक्त काही काका, मामा घरी येऊन सल्ले देऊन गेले, की एखादा चांगला मुलगा बघून माझे पुन्हा लग्न लावून द्यावे. सापत्य घटस्फोटितेसाठी चांगला मुलगा मिळणार नाही हे मी जाणून होते. त्या सर्वांनाही याची कल्पना होती. लग्न-बिग्नाच्या भानगडीत न पडता मी एके दिवशी कॉलेजमध्ये दाखल झाले.

कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात शिकत असताना एके दिवशी घरी आल्यावर बघते तो काय, बाबांच्या छातीत दुखत होते. तातडीने हॉस्पिटलमध्ये नेऊन देखील बाबांना आम्ही वाचवू शकलो नाही. बाबा गेले. बाबांच्या पार्थिवाचे दर्शन घ्यायला काका, मामा आले खरे, पण बाबांच्या नंतर आमचे घर कसे चालते आहे, आम्ही उपजीविका कशी करतो आहोत हे बघायला मात्र कोणी फिरकले नाही. साठवलेला पैसा संपल्यावर आई नातेवाईकांकडे उधार मागायला गेली, तेव्हा सगळ्यांनी स्वत:च्याच अडचणींचा पाढा वाचून आईला परतवून लावले. घरच्या बागेतली भाजी होती पण भात तर शिजवायला पाहिजे, पोटात काहीतरी ढकलायला पाहिजे, बाकी खर्चही दिवसेंदिवस वाढतच होते.

वर्षभरानंतर दोन काका काहीही न सांगता - सावरता हजर झाले आणि ‘घर सोडा’ म्हणाले. माझ्या बाबांनी म्हणे घर दोन्ही भावांना लिहून दिले होते. काकांनी ते लिहून दिल्याची कागदपत्रे दाखवली, घराची कागदपत्रेही दाखवली. घराचे कागद आई कपाटातून काढून घेऊन आली. ते कागद एका काकांनी हातात घेऊन फेकून दिले. म्हणाले, ‘‘हे जुने कागद आहेत.’’ मग स्वत:च्या हातातले कागद आईच्या तोंडापुढे नाचवत म्हणाले, ‘‘हे- हे नवीन कागद आहेत.’’ काकाचे असले विचित्र वागणे पाहिल्यावर त्यांना ‘काका’ म्हणायला जीभ धजावेना. वाटलं, काकांचे मुखवटे घालून दोन खुनीच आम्हाला त्रास देत आहेत. जाण्याआधी ते त्यांच्याकडच्या दोन्ही खोट्या कागदपत्रांच्या प्रती ठेवून गेले. आणि मोठे उपकार करत असल्याचा आव

आणून जाताना दोघे आम्हाला एक-दोन दिवसांत नव्हे, तर एका आठवड्यात घर खाली करा असे सांगून गेले.

आईने मामाकडे धाव घेतली. मामा दोन दिवस काकांकडे जाऊन भांडून आले. त्यानंतर का कोण जाणे, पण अचानक मामाही गप्प बसले. काकांशी भांडायला जाण्यात अर्थ नाही म्हणाले, कारण काकांकडचे कागद खोटे आहेत याचा काही पुरावा नाही. बाबांची सही तर खरी आहे. आई आणि मी म्हणालो, 'बाबा तर कधी बोलले नव्हते की त्यांनी दोन्ही भावांना घर लिहून दिले आहे म्हणून! त्याशिवाय काकांनीही यापूर्वी कधी तसा दावा केला नाही. आत्ता अचानक हे कागद कुठून उगवले?' मामा म्हणाले की कुठून उगवले ते माहीत नाही. पण म्हणे माझ्या लग्नासाठी बाबांनी काकांकडून मोठी रक्कम उधार घेतली होती. लग्न झाल्यावर ज्या कालावधीत ते पैसे परत करीन असा बाबांनी शब्द दिला होता, तो ते पाळू शकले नाहीत, त्यामुळे नाइलाजाने त्यांनी घर काकांच्या नावे लिहून दिले. मी एकुलती एक मुलगी, माझे लग्न झालेले, त्यामुळे बाबांच्या पश्चात जावयाची धन करण्यापेक्षा भावांची संपत्ती भावांना जाणेच योग्य- असा म्हणे बाबांनी विचार केला.

या कहाणीवर ना माझा विश्वास बसला, ना आईचा. आम्ही तक्रार नोंदवायला पोलीस ठाण्यात गेलो. आमच्या घराचे खरे कागद पोलिसांना दाखवले. पोलीस हसून म्हणाले, की 'काकांनी आधीच त्यांना कागदपत्रे दाखवली होती. त्यात लिहिले होते की बाबांनी काकांना घर विकले आहे.' आम्ही जेव्हा पोलिसांना सांगितले की ते कागद खोटे आहेत, तेव्हा त्यांनी हसून मान हलवली. म्हणाले, ''ते कागद मुळीच खोटे नाहीत.'' मी चिडून म्हटले, ''माझ्या बाबांची ती सही खोटी नाही हे तुम्हाला कसे कळले? तुम्ही तर बाबांची सही कधी पाहिलेली नाही.'' ते लोक पुन्हा हसून म्हणाले, ''वकिलाने सही तपासली आहे. त्यांचा शिक्का वगैरे सगळं काही त्यावर आहे. वकिलासमोर बसूनच त्यांनी सही केली होती.''

नाइलाजाने आम्हाला मामांच्या घरी आश्रय घ्यावा लागला. सुरुवाती-सुरुवातीचे सौजन्य- आदरातिथ्य हळूहळू आटत गेले. आमचा त्यांच्यावर भार होता हे काय आम्हाला कळत नव्हते का! मामाच्या घरातली कामे आई एकहाती करू लागली. शेवटी आईला जणू त्यांनी कामासाठीच ठेवली होती. दु:ख-शोक झटकून कधीतरी बाहेर पडायचेच होते. मी आईला सांगितले की

मी नोकरी करणार आहे. आई थक्कच झाली. म्हणाली, शाळेच्या शिक्षणाकर चांगली नोकरी मिळणार नाही. कॉलेज पूर्ण होऊ दे. कॉलेज शिक्षण पूर्ण हायला अजून बराच अककाश होता. खरे तर मला फार चांगल्या नोकरीची आशा नव्हतीच. काहीतरी करून आम्हा तिघी कन्यांना भाड्याच्या झोपडीत राहायला मिळाले तरी चालेल. आई, मी, भाकना- आम्ही सगळ्याच कोणाची ना कोणाची तरी कन्याच ना? नकोशा - कन्या.

मी कॉलेज सोडून नोकरी शोधायच्या मागे लागले. बाबांचे सहकारी गाईड्स, आणि बाबा लायब्ररीत काम करायचे तिथले त्यांचे सहकारी आईची आणि माझी हतबल अवस्था बघून 'नोकरी मिळवून द्यायचा प्रयत्न करू,' असे म्हणाले होते. पण शेवटी सगळेच म्हणाले की नोकरी मिळवून देणे शक्य नाही. कुठेच नोकऱ्या उपलब्ध नाहीत. सगळीकडे पंचाईतच आहे. पुरुषांनाच नोकऱ्या मिळत नाही आहेत, मग बायकांना नोकरी मिळण्याचा प्रश्नच येत नाही - असे सगळ्यांनी स्पष्ट सांगितले. हिल्सामध्ये नोकऱ्या नव्हत्या, निदान माझ्यासाठी तरी नाही, मामांचे कापडाचे दुकान होते, तिथेही माझ्यायोग्य नोकरीची शक्यता नव्हती.

शेवटी, गावातले जे लोक नोकरीसाठी दिल्ली, मुंबईला गेले होते त्यांचा मी शोध घ्यायला लागले. ते सगळे नोकरी करून घरी चांगले पैसे पाठवत होते. काहीजण कुटुंबासह दुसऱ्या शहरात वस्तीला गेले होते. शोध घेता घेता, माझ्याबरोबर लहानपणी भातुकली खेळणारी मैत्रीण गरिमा, हिच्याशी माझा संपर्क झाला. तिच्याशी फोनवर बोलणेही झाले. ती मुंबईमध्ये धारावीत होती. कपड्यांच्या कारखान्यात नोकरी करत होती. बिहारच्या आणखीही दोन मुली तिच्याबरोबर तिथेच नोकरी करत होत्या. गरिमाने मला आपणहूनच सांगितले की मी मुंबईला जावे, ती मलापण कपड्यांच्या कारखान्यात नोकरी लावून देईल आणि त्या तिघींच्याच खोलीत मीपण राहू शकेन. जो पगार मिळेल त्यात मुंबईचा खर्च भागून हिल्साला घरी पैसे पाठवता येतील. काही दिवस माझे आणि तिचे बोलणे चालू होते. मी कॉलेज सोडले आणि मुंबईचे तिकीट काढले.

गरिमाच्या कृपेने मला डोक्यावर छप्पर मिळाले, नोकरी मिळाली, हातात उत्पन्नाचे साधन आले. मुंबईत राहण्या-खाण्याचा खर्च वजा जाऊन मी घरी आईला आणि माझ्या मुलीला पैसे पाठवू शकत होते. त्या पैशातून आईने

मामाच्या घराजवळच एक घर भाड्याने घेतले. ते कसेही असले तरी स्वत:चे घर होते. दुसऱ्याच्या राजमहालात आश्रित म्हणून राहण्यापेक्षा स्वत:च्या मातीच्या घरात राहणे कितीतरी सुखाचे असते. आईलापण बरेच दिवसांनी विश्रांती मिळाली. भावना आईच्या छत्राखालीच वाढत होती. तिच्याशी रोज व्हिडिओ कॉलवर बोलणे झाले नसते तर ती मला हळूहळू विसरूनच गेली असती. मामाने एक जुना स्मार्टफोन आईला दिला होता म्हणून बरे, नाहीतर मलाच तिच्यासाठी पाठवावा लागला असता. फोन असल्यामुळे मी माझ्या आईशी आणि मुलीशी समोर बसून बोलल्याप्रमाणेच गप्पा मारू शकत होते. आमच्या दरम्यान असलेल्या हजारो मैलांच्या अंतराची जाणीवसुद्धा होत नव्हती. सगळा दिवस कारखान्यात काम केल्यानंतर जो काही वेळ उरायचा तो मी मुद्दाम त्या दोघींसाठीच राखून ठेवायची.

कारखान्याच्या मालकाने, शक्य असते तर आमच्याकडून रात्रभरदेखील काम करून घेतले असते. आम्हालाही काही आयुष्य आहे, खाणे-पिणे, विश्रांतीची गरज आहे, आमचीही काही स्वप्ने आहेत, ती पूर्ण करण्याचे स्वप्न आहे, या कशाचीच त्याला पर्वा नव्हती. रात्री शिवानी माझ्याजवळ झोपायची. ती माझ्यापेक्षा वयाने लहान होती. माझा फोन घेऊन त्यातल्या भावनाच्या फोटोकडे ती अनिमिष नजरेने बघत राहायची. आपल्यालाही मूल असावे असे बहुधा तिला वाटत असावे. बरेचदा शिवानी रात्री उशिरापर्यंत तिच्या बालपणीच्या, किशोर वयातील आठवणी सांगत बसायची. बोलताबोलताच तिला झोप लागायची, अगदी गाढ झोप. कारखान्यात जायची वेळ झाली की तिला हलवून उठवायला लागायचे.

करोना आल्यावर लॉकडाऊन सुरू झाला, आणि कारखाना अनिश्चित काळासाठी बंद झाला. आम्हाला आठवड्याचा पगार दिला, आणखी एका आठवड्याचाही आगाऊ पगार दिला; पण तो चुटकीसरशी संपला. त्यानंतर खायचे काय, घराचे भाडे कसे द्यायचे, हा लॉकडाऊन कधी संपणार, कारखाना कधी सुरू होणार, हे कोणीच सांगू शकत नव्हते. कारखान्याच्या मालकांनीही स्पष्ट केले की तेही निश्चित काहीच सांगू शकत नाहीत. आमची कोणतीही जबाबदारी त्यांना घ्यायची नव्हती. आम्ही कुठे जाणार, काय खाणार, कुठे राहणार, या कशाशीच त्यांना देणेघेणे नव्हते. 'अशा संकटात त्यांच्या कर्मचाऱ्यांची काळजी त्यांनीच घ्यायला नको का?' हा प्रश्न मी केला

खरा, पण गरिमा, शीला, किंवा शिवानी या कोणाकडेच त्याचे उत्तर नव्हते. कितीही वाटले तरी गरिमा मालकाविरुद्ध कोणतीही तक्रार करू धजत नव्हती. भिंतींनादेखील कान असतात. हीच नोकरी तिच्यासाठी फार महत्त्वाची होती. हिल्सामधल्या घरी तिचे बाबा अपंग होऊन पडले होते. दोन धाकटे भाऊ शाळेत होते. अशावेळी इतर कोणासाठी नाही तरी बाबांच्या उपचारांसाठी पैसे पाठवणे आवश्यक होते. डॉक्टर म्हणत होते की दोन-तीन वर्षांत बाबांच्या हातापायांत पूर्वीसारखी शक्ती येऊ शकेल. तोपर्यंत तरी कारखान्याच्या मालकाने काय करणे योग्य, काय अयोग्य, याबद्दल तिला बोलायचे नव्हते. कोणाशीही भांडण उकरून काढायची तिची इच्छा नव्हती. पैशापाण्याची गरज माणसाला खालमानेनेच जगायला लावते. माझीही मान खालीच नव्हती का? मॅनेजरबाबू जेव्हा अरेरावीने बोलत होते, तेव्हा माझीही मान खालीच होती ना! शीला देखील काय बोलणार? तिला घरी कोणासाठी पैसे पाठवायचे नव्हते, पण तिला या नोकरीची खूप गरज होती. ती बारा वर्षांची असताना दुकानातून काहीतरी खरेदी करून घरी येताना दोघाजणांनी तिला पळवून नेले. शीला घरी पोचलीच नाही. सहा महिन्यांनी पोलिसांनी तिला दिल्लीच्या जी. बी. रोडवरच्या वेश्यावस्तीतून सोडवले. गयेतील तिच्या घरी पोलिसांनी तिला पोचवले, पण घरचे लोक तिचा तिरस्कार करू लागले, जणू ती आली नसती तरच बरे झाले असते. शेजारी-पाजारी देखील तिरस्कार करू लागले. त्या सगळ्या प्रतिकूल वातावरणातून शीला मुंबईला पळून गेली. कारखान्याचा मालक निष्ठुर असला तरी त्याच्याच दयेने तिला पोटाला अन्न, राहायला डोक्यावर छप्पर मिळाले होते. कुटुंबाच्या नरकयातनांतून सुटका झाली होती. शीलाला याहून अधिक कशाचीच अपेक्षा नव्हती. घरी जाण्यापेक्षा धारावीत राहणेच तिला पसंत होते. पण फॅशनेबल कपडे, वस्तू घेण्यात पैसा खर्च झाल्यामुळे तीही कफल्लक होती. शिवानी सुद्धा ओठ शिवून होती. लॉकडाऊनमध्ये घरी जायची सुवर्णसंधी तिला मुळीच सोडायची नव्हती. तिथे तिच्या भावी वराशी भेट होईल, स्पर्शसुख, चुंबन याची मजा लुटता येईल.


संसर्ग होईल, संसर्ग होईल म्हणत माणसे गावी जायला, घरी जायला रेल्वे स्टेशनकडे धावत होती. आमच्यासारखीच माणसे धावत होती- बांधकामावरचे, कारखान्यातले मजूर, कामगार - कोणी एकेकटे, कोणी जथ्यांनी, कोणी कुटुंबाला घेऊन. कोणाच्या डोक्यावर बॅगा, कोणाच्या काखोटीला पिशव्या,

गाठोडी, कोणाच्या कडेवर मूल. घरी जायचे. घरी त्यांचे कोणी ना कोणी आहे, थोडी शेती आहे, उपाशी तरी मरणार नाही. पण जेव्हा अशी परिस्थिती आली की स्टेशनवर जागा नाही, तिकीट काढायला पैसे नाहीत, तेव्हा काही लोकांनी निर्णय घेतला की शक्य होईल तिथपर्यंत चालतच जाऊ या. चालत? कुठवर चालत जाणार? जिथे घर आहे, तिथवर. या निर्णयाप्रत पोचले शेकडो- नव्हे- हजारो लोक. गरिमा म्हणाली, जाऊ या तर, जरा दूर गेले की काहीतरी वाहन मिळेल. कुठल्या तरी जवळच्या स्टेशनवर जाऊ. तिथे ट्रेन नाही मिळाली तर पुढच्या स्टेशनवर जाऊ. आणि तिथेही नाही मिळाली तर चालतच जाऊ. मुंबईहून बिहार किती किलोमीटर दूर आहे, हे नेटवर बघितले. बिहारमधल्या एका ठिकाणाचे अंतर होते १५०० किमी, तर दुसऱ्या ठिकाणाचे अंतर होते १७०० किमी. कहर म्हणजे हे आकडे ऐकून कोणालाही धक्का बसला नाही. या आकड्यांची फारशी फिकीर नव्हती, पण खिशात किती पैसे आहेत हेच सगळे जण बघत होते. मीही तेच बघितले ना! सगळेच जण आपल्या गावी काही ना काही पैसे पाठवत होते, कोणाच्याच हातात जास्तीचा पैसा नहता. धारावीच्या घरातच दोन महिने राहून परिस्थितीचा अंदाज घ्यावा असे आम्हाला सर्वांनाच वाटत होते; पण ही चैन करण्याचे कोणाचेच धाडस नव्हते; कारण आमच्या गाठीशी काहीच नव्हते.

गरिमा आमच्या खोलीतल्या इतर दोघी - शीला आणि शिवानीला उद्देशून म्हणाली, ''आपल्याला वाहन नाही मिळाले तर चालत जाऊ, पण इतके अंतर चालून जाणे कोणालाच शक्य नाही, त्यापेक्षा कोणाकडून तरी पैसे उधार घेऊन का होईना आणखी काही दिवस आपण वाट पाहणे योग्य ठरेल. कदाचित कारखाना काही दिवसांनीच सुरू होईल! आणि जरी नाही सुरू झाला तरी काही दिवसांनी ट्रेनचे तिकीट तरी मिळेलच.'' पण बाकीच्या, आंधळे अंधारात बसावेत, तशा बसून राहिल्या. जणू काही रस्ताच त्यांना प्रकाश दाखवणार होता. जणू काही कारखाना कायमचा बंद झाला होता. कोणाकडून कसलीच आशा नाही, कोणाचाच भरवसा नाही.

◆

## अभिप्राय




**हाटूमुटूचा चंद्र**

**फारूक एस.काझी**

पृष्ठे : ७६
किंमत : २५०

### हाटूमुटूचा चंद्र : आवश्यक जडणघडणीची सफर

हाटूमुटूचा चंद्र हा बालकथासंग्रह हातात आल्याबरोबर सुंदरसुंदर रंगीत चित्रांच्या मांडणीमुळे आपल्याला चट्कन आकर्षित करतो. पानं पलटत एकापाठोपाठ रेखाटलेली चित्रं पाहतापाहता आपण कथांमधून चित्रित होणाऱ्या मुलांच्या गोष्टींशी कधी एकरूप होऊ लागतो तेच कळत नाही. लेखक फारूक एस. काझी यांनी प्रस्तुत बालकथासंग्रहात सहज सोप्या भाषेच्या माध्यमातून मोठ्या कल्पकतेनं, मुलांच्या संदर्भातून विविध अनुभवांची नाट्यमय गुंफण सादर केलेली आहे. ही गुंफण छोट्या वाचकांना तर भावणारी

आहेच; पण मोठ्या वाचकांनासुद्धा ती तेवढीच आवडेल अशी आहे.

बालसाहित्य हा लेखनप्रकार अनेक कारणांनी महत्त्वाचा असतो. पण, अजून आपल्याकडे त्याची फारशी गांभीर्यानं दखल घेतली जाताना दिसत नाही. शिवाय जग कितीही स्वतःला 'आधुनिक' म्हणून जाहीर करत गेलं, तरीही ग्रंथ प्रत्यक्षात हातात घेऊन वाचणं याला दुसरा पर्याय नाही. पुस्तकातील अक्षरांच्या जगाची सफर मुलांच्या मेंदूतील अगणित केंद्रं सक्रिय करत असते. त्यांची आकलनक्षमता वृद्धिंगत होत असते. एकाचवेळेस दृक् व श्राव्य संवेदन त्यातून समृद्ध होत असते. पडद्यावरची धावती चित्रे ही चट्कन हवेत विरून जाणारी असतात. पण, स्वतःच्या ऐंद्रिय संवेदनांच्या माध्यमातून पानांवरून बोलकी होणारी वाक्ये मनःपटलावर आपले ठसे उमटवत असतात. हे ठसे हवेत विरून न जाता कायमस्वरूपी पदरी मोलाचं दान टाकून जात असतात. कळतनकळत मनन–चिंतन या प्रक्रिया घडवत असतात. खऱ्या अर्थानं व्यक्तिमत्त्व विकसित करत असतात. सध्याच्या डिजिटल युगात तर बालसाहित्याचं महत्त्व अधिकच वाढलेलं आहे.

मुलांच्या संस्कारक्षम वयातच त्यांना पुस्तकांशी जोडून घेण्याचं काम तर बालसाहित्याच्या माध्यमातून होत असतंच. शिवाय त्यांची सर्वांगीण जडणघडण त्यातून अधिक चांगल्या प्रकारे होऊ शकत असते. ज्या प्रकारे साहित्य हे त्या-त्या भाषा-संस्कृतीचा, त्या-त्या समाज-संस्कृतीचा आरसा असतं, त्याच प्रकारे बालसाहित्यसुद्धा त्या-त्या भाषा-संस्कृतीचा आरसाच असतं. त्यामुळे चांगलं बालसाहित्य हे एक प्रकारे मुलांना नैतिकतेच्या प्रशिक्षणाचं व्यासपीठच असतं असं म्हटलं तर तर वावगं ठरू नये.

मोठ्यांच्या जगातील रूढ असणारे संकेत, व्यवहार, प्रतिष्ठेच्या संकल्पना, प्रस्थापित विषमतेच्या रीतिभाती या बाबीसुद्धा बालसाहित्यायोगे साकारू शकतात. प्रस्थापित जीवन व्यवहाराला घेरून असणाऱ्या मानवतेला काळिमा फासणाऱ्या प्रस्थापित कुप्रथासुद्धा रंजक पद्धतीनं बालसाहित्यात रेखाटल्या जाऊ शकतात. त्यामुळे बालसाहित्याची चिकित्सा करताना लेखक कोणत्या प्रभाव व पगड्याखाली वावरत आहे हेही अधोरेखित करता येते. म्हणजे प्रस्थापित सामाजिक, सांस्कृतिक मानसिकताच बालसाहित्यकृतीत चित्रित होताहेत, की नव्या, परिवर्तनशील, डोळस, विज्ञाननिष्ठ जीवनदृष्टीस पुरस्कृत केलं जात आहे, या प्रश्नाच्या अनुषंगानंही बालसाहित्याचा विचार करणं शक्य

आहे. उलट तेच अधिक सयुक्तिक ठरेल.

बालसाहित्याचं स्वरूप चिकित्सेनं पाहू गेलो तर तिथं मुलांची शब्दशक्ती विकसित करणं हे मुख्य प्रयोजन राखल्याचं आढळेल. पण, हे एकमेव प्रयोजन राखून चांगली साहित्यकृती निर्माण होईल असं वाटत नाही. त्यामुळे त्याच-त्याच गुळगुळीत रहस्यकथांच्या, अद्‌भुतरम्यतेच्या केवळ काल्पनिक परीकथांच्या आभासी दुनियेत मुलांना फिरवून आणलं जात आहे की, मुलांच्या भाषेचा विकास साधण्याबरोबरच त्यांच्याठायी पायाखालील मातीशी प्रतारणा न करण्याचं भान विकसित होत आहे हे पाहणं केव्हाही जास्त योग्य ठरेल. व्यापक अर्थानं पाहायचं झालं, तर जसं पालकांनी स्वतःच्या गुळगुळीत मनोकामना मुलांवर लादत राहण्यापेक्षा सक्षमतेनं व्यापक भूमिकेतून त्यांनी जगात वावरावं, आपला स्वतंत्र ठसा उमटवून जग खरं सुंदर कसं होईल हे पाहावं, त्यासाठी मुलांना संधी देण्यासाठी तत्पर व्हावं; हे जसं आपण म्हणत असतो, तसंच त्याच प्रकारचे संस्कार बालसाहित्यानं वाचकांच्या मनावर ठसवावेत अशी अपेक्षा रास्त ठरेल. हेच अधिक सुटसुटीतपणे सांगायचं म्हटलं तर समाजात दृढ होऊन बसलेले चांगले आणि वाईट व्यवहार लेखक लहान वाचकांपर्यंत पोहोचवत आहेत का, हे पाहता आलं पाहिजे. तसं पाहणं हीच खरी बालसाहित्य वाचनाची एक विकसित अवस्था असल्याचं अधोरेखित करावं लागेल.

****

आजची छोटी मुलं ही भविष्यातील मोठी माणसं असतात. पुढच्या जीवनातील जगण्याशी संबंधित व्यवहारांचं ज्ञान व विज्ञान त्यांना समजावून सांगायला हवं. याच भूमिकेतून प्रस्तुत कथा साकार होताहेत ही या बालकथांची जमेची बाजू आहे. माणसांना संपन्न करणाऱ्या भावभावनांचं स्वरूप त्यांच्या ओळखीचं व्हावं यासाठी या कथा प्रयत्नरत आहेत. अवघड प्रसंगात टाकणाऱ्या अडचणी मोठेपणी येऊ नयेत यासाठी रोपांना योग्य ते खतपाणी घालून त्यांची नीट मशागत प्रस्तुत कथा करत आहेत. त्यासाठी वेगवेगळ्या अनुभवविश्वातून मुलांना या कथा नेत आहेत. समोर ठाकलेली परिस्थिती समजून घेण्याची क्षमता त्यांच्यात निर्माण व्हावी ही आस या कथा बाळगत आहेत. एकूण माणूस हा प्राणी भावभावनांच्या जाळ्यात कसा गुरफटलेला असतो याचं बालसुलभ चित्रण करण्याचा प्रयत्न प्रस्तुत बालकथांतून

झालेला दिसतो. 'हाटूमुटूचा चंद्र'मधील फारूक एस. काझी यांच्या बालकथा मराठी बालकथासाहित्य चांगल्या अर्थी समृद्ध करणाऱ्या बालकथा आहेत. प्रस्तुत बालकथा भारतीय संतांच्या परंपरांनी आग्रहानं पुढं आणू पाहिलेल्या नैतिकतेशी कटिबद्ध आहेत. बंधू-भगिनीभाव, क्रियातत्परता, सत्शीलता, प्राणिमात्रांविषयी आस्था, सकारात्मकता ही मूल्ये जोपासू बघणाऱ्या या कथा आहेत.

या कथांतून आपल्याला मोठी समंजस मुलं भेटतात. ही मुलं जगण्यात निर्माण झालेल्या गुंत्यांची उकल करू लागतात. मोठ्यांच्या दुनियेत बजबजत असलेला स्वार्थ, भेदभाव, बेजबाबदारपणा, अविचारीपणा, अधर्म अशा अराजक निर्माण करणाऱ्या घटकांना या छोट्यांच्या दुनियेत जागा नाही. त्यामुळे हे छोटे-छोटे जीव खरंतर चांगले मार्गदर्शक आहेत असं म्हणायला हवं. उदाहरणार्थ 'एसपी १३'मधील समायरा, 'फिकर नॉट'मधील अर्पित, 'करके देखो' या टीममधील मुलांचं कार्य, 'जखम'मधील योगेश, 'जाऊ दे त्याला'मधील निधी, 'बाबांची भाषा'मधील सारंग, 'मैतर'मधील अमृत, 'स्वप्न'मधील अंकित, 'हिरवं सपान'मधील चंदा आणि मंदार, 'हाटूमुटूचा चंद्र'मधील साक्षी या सर्व चित्रित व्यक्तिरेखा सध्या जरी त्यांच्या लहानपणात वावरत असल्या, तरी त्यांच्याठायी विशाल दृष्टिकोनानी युक्त, आदर्श वाटावं असं प्रौढांचं जग दडलेलं आहे. खरंतर हेच या बालकथांचं सौंदर्य आहे.

'हाटूमुटूचा चंद्र' हे शीर्षक वाचताक्षणी कुतूहल जागवतं. जेव्हा आपण या शीर्षकाची संग्रहातील बालकथा वाचतो तेव्हा त्याच्या मागं दडलेलं कारुण्य आपल्या मनाची पकड घेतं. खरंतर 'चंद्र' ही प्रतिमा अनेकार्थानं समृद्ध असलेली प्रतिमा. पण, या कथेत झाडावरून ओघळून मातीत पडलेल्या पानांमध्येच आपला 'चंद्र' पाहिला जातो आहे. खरंतर 'खोटा-खोटा चंद्र' असं बालकथेत म्हणावं की नाही असा प्रश्न पडतो; पण प्रत्यक्षातील गरिबी तशी कल्पना करायला भाग पाडत असावी! या कथेतील साक्षी ही कोरोनात मृत झालेल्या गरीब वडिलांची मुलगी आहे. तिची विधवा आई व आजी घर चालवण्याची कसरत करत आहेत. अशात साक्षीच्या शाळेनं सहलीचं आयोजन केलेलं आहे आणि त्यासाठी लागणारे पैसे साक्षीला घरातून मिळूच शकणार नाहीत ही वस्तुस्थिती. त्यामुळं खट्टू झालेल्या साक्षीच्या बालमनाची समजूत कशी पटवली जाते याचं दर्शन ही कथा घडवते. या कथेत आजी

आणि नात यांच्यात असणारा सुसंवाद ही आजच्या घडीला जमेची ठरणारी बाजू लेखकानं प्रकाशात आणली आहे.

कथासंग्रहातील पानापानांतून लेखक फारूक एस. काझी यांची जीवनाकडे पाहण्याची सकारात्मक दृष्टी डोकावते. त्यांनी चित्रित केलेली छोट्या मुलांची भावविश्वं लहानग्यांना खूपकाही शिकवणारी आहेत. स्वतः लेखक पेशानं शिक्षक असल्यानं मुलांच्या संस्कारक्षम मनावर कोणते संस्कार उमटावेत या दक्षतेतून या कथा आकार धारण करताहेत असं दिसतं. या संग्रहातील दहाही कथांतून मुलांची घडण कशी व्हावी यावर प्रकाश पडतो. प्रत्येक कथेतील मुलांच्या व्यक्तिरेखा बोलक्या आहेत. त्या आपले अनुभव पारखून घेत आहेत. त्यातून जगण्याचे धडे गिरवत आहेत. शहाणपण गाठीशी मारत आहेत. शिकत आहेत आणि शिकवत आहेत. हे सर्व घडत आहे तेही बालकथेच्या ढाच्यात. सहज, सोपी, सुटसुटीत भाषा, अद्भुतरम्य वाटेल अशी शैली या आशयसूत्रांचं माध्यम बनलेली आहे.

‘हाटूमुटूचा चंद्र’मधील सगळ्याच कथा आशयानुरूप शीर्षक घेऊन आलेल्या आहेत. वास्तविक या दहाही कथा इसापनीतीप्रमाणं बोधकथा आहेत. मुलांमध्ये जीवनाकडे पाहण्याचा मानवतावादी परिवर्तनशील दृष्टिकोन निर्माण करू पाहणाऱ्या आहेत. या कथांतून प्रामुख्यानं निसर्ग, प्राणी व मानवी वृत्तींबाबतची सूक्ष्मता गोचर झालेली आहे.

‘एसपी१३’ ही पहिली कथा मुलांना निराळाच प्रत्यय देऊन जाते. मुलांना भावेल अशी वातावारणनिर्मिती लेखकानं केलेली आहे. मुलांना आकर्षण असणाऱ्याच घटकांचा वापर करत पृथ्वीवरचं जीवन कसं असावं याचं निदर्शन ही कथा करते. समायरा नावाची मुलगी या कथेत भेटते. तिचा मामा स्पेसशिप तयार करत असलेल्या प्रयोगशाळेत संशोधक असल्यानं त्याच्यासोबत तिचा तिथं वावर असतो. एक दिवस ती एकटी असताना चुकून तिच्या हातून छोटं स्पेसशिप चालू होतं. पाहतापाहता ती अंतराळात उडू लागते. गडबडते. कोसळलेल्या परिस्थितीचा सामना करू लागते. घरचे काळजीनं आणि दुःखानं ग्रस्त होऊन जातात. तिचा शोध घेतला जातो; पण पत्ता लागत नाही. पुढे मामा आणि सहकारी ख्रिस यांचं स्पेसशिप अंतराळात मंगळाकडे उड्डाण करतं. पण, दिशा भरकटत ते कुठल्याशा निराळ्याच ग्रहावर धडकतं. त्यांचं यान अज्ञात प्राणी पकडून ठेवतं. काहीसे मानवासारखे आणि पुष्कळसे निराळे

दिसणारे ते प्राणी मामा व ख्रिस यांची उलटतपासणी घेऊ लागतात. रोचक शैलीत अद्भुत वाटावं अशा तऱ्हेनं हरवलेली समायरा मामाला तिथं भेटते; पण आता समायरा बदलली आहे. ती का बदलली हे मुळातून समजून घ्यावं असंच आहे. अरुण साधू यांच्या 'विप्लवा' या कादंबरीची आठवण ही कथा ताजी करते. ही कथा छोट्यांना तर आवडेलच; पण स्वार्थानं बरबटून गेलेल्या पृथ्वीवरील माणसांपेक्षा अधिक स्वच्छ नीतिमत्ता या अज्ञात ग्रहावरील जीवांच्या ठायी आहे हे चित्र लक्ष वेधतं. आपल्या घराला विसरून अशा स्वच्छ ग्रहावर रमून गेलेली समायरा अनेक महत्त्वाच्या गोष्टींचं सूचन करते. एकूणच, पृथ्वीचं नुकसान करत सुटलेल्या स्वार्थांधतेच्या डोळ्यांत अंजन घालण्याचं हे काम निश्चितपणानं वेधक आहे.

लहान मुलांनी कसं वागू नये हे शिकवणारी 'जखम' नावाची अशीच आणखी एक आशयसंपन्न कथा आहे. योगेश हा तरुण शहराकडून ओढीनं गावाकडे जातो. आईशी बोलताना शाळेची चौकशी करताकरता शाळेसमोरील जुनं प्रचंड मोठं चिंचेचं झाड पाडणार आहेत हे त्याला समजतं. अस्वस्थ होऊन तो पाहायला जातो. त्याच्या लहानपणी त्याच्या हातून घडलेली माकडांबाबतची व्रात्य घटना त्याला आठवते. ते आठवून त्याला आता कसा पश्चात्ताप होऊ लागतो त्याचं चटका लावणारं दर्शन इथं आपण घेतो. 'माकडांची हत्या करणं हे पाप आहे.' या शतकानुशतकांपासून चालत आलेल्या संकेताचं आजच्या प्रगतीच्या नावाखाली सुरू असलेल्या गदारोळात पुनर्वाचन करण्याची इथं दडलेली प्रेरणा वैशिष्ट्यपूर्ण ठरेल.

'बाबांची भाषा' ही लहान मुलांनी आधुनिक तंत्रज्ञानाचं उपयोजन चांगल्यासाठी केलं तर ते हवंच आहे हे सांगणारी कथा आहे. छोट्यांना आपण चिल्लर समजता उपयोगाचं नाही. त्यांच्यामध्ये बदलत्या दिवसांची आव्हानं पेलण्याची सामर्थ्यं असू शकतात. पण, नवं येताना जुन्यातलं भावनिक विश्व लोपून जाता कामा नये, हा संदेश या कथेनं देण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. काही झालं तरी 'बाबांची भाषा' मिटून चालणार नाही हे सुचणंसुद्धा अनमोलच. त्याच बरोबर 'मैतर'मध्ये गावकरी आणि भटक्या जमातीतील माणसं यांच्यात आपुलकीचं नातं असावं ही अपेक्षाही रास्तच. 'जाऊ दे त्याला' या कथेतून जंगलातील प्राणी हे मानवापेक्षा नाती चांगल्याप्रकारे जोपासत असतात याचं घडणारं दर्शन म्हणजे अंजनच. माणसांनी आपापल्या

जातीपातीत स्वतःला बंदिस्त करून घेणं बरोबर नाही. जंगलातील प्राण्यांकडून तरी शिकावं जिव्हाळा कसा जागवायचा असतो. याची शिकवण देणारी ही कथा 'आफताब' म्हणजे सूर्य आणि 'शबताब' म्हणजे काजवा अशी दोन महत्त्वाची नावं मिळालेल्या अस्वलाचं चित्रण करते.

त्याच बरोबर 'हिरवं सपान' या बालकथेत शहरातील सिमेंटच्या जंगलातून आलेल्या मंदारला निसर्गाच्या कुशीत विसावलेल्या गावाचं, तिथं पसरलेल्या रम्यतेचं दर्शन घडवणारी मंदा आजच्या घडीला आवश्यक असणारंच जागरण करू पाहते. शहर आणि गाव यांच्यामध्ये दरी निर्माण होण्यापेक्षा त्यांमध्ये असलेला भावगहिरा अनुबंध पृष्ठभागावर आणण्याचा इथं प्रयत्न होतो. 'स्वप्न' ही बालकथा सायकलीचं आत्मवृत्त नव्या पद्धतीनं मांडते. त्यामधून पैसेवाले आणि गरिबी सोसणारे यांच्यामध्ये असणारा फरक ती अचूकतेनं टिपू लागते. पैसेवाल्या बापाच्या पोराचं बेदरकार वर्तन या सायकलीला आवडत नाही. अंकित या नोकराच्या मुलाकडे तिला सोपवलं जातं. तिथं मिळणारी आस्था तिला मनापासून आवडते. सायकलीची कळी खुलत जाते. या प्रकारे सामाजिक विषमतेचं सायकलीच्या अनोख्या रूपात लेखक दर्शन घडवतो. 'छत्रीचं आत्मवृत्त' हे लहानपणी आपल्यापैकी प्रत्येकालाच शालेय दिवसांत भेटलेलं असतं. त्याच धर्तीवर हे सायकलीचं कथन मुलांपर्यंत एक चांगलं मूल्य पोहचवेल. आपला स्वभाव कसा असावा आणि कसा नसावा याचं चित्र समोर ठेवेल.

या प्रकारे प्रस्तुत बालकथा वेगवेगळ्या अनुभवांतून प्रवास करतात. निर्माण झालेल्या चुकीच्या गोष्टींना मिटवून तिथं चांगल्या घटकांचं नियोजन करण्याचा हेतू राखतात. निसर्गरम्य वातावरणात हवीहवीशी वाटेल अशी मुलांची हिरवीगार सफर घडवून आणतात. प्रत्येक कथेत मुलांचे थोरांशी सुसंवाद चित्रित झाले आहेत. त्यामधून मुलांना स्वास्थ्य देणारी घरादारात वावरत असणारी माणसं आणि नातीगोती महत्त्वाची असतात; हा संदेशही मनःपटलावर उमटतो. मामा-भाची, पिता–पुत्र, आई–लेक, आजी–नात, गावकरी–शहरवासी, गावकरी–भटक्या जमाती, बालपण–प्रौढपण यामध्ये कार्यरत असणारे परस्परसंबंध कथाशय घसघशीत करण्यात हातभार लावतात. त्याचबरोबर प्रस्तुत कथांतून चित्रित झालेलं कचरा निर्मूलनाचं मुलांचं सांघिक कार्य असो, गरिबीची जाण असो, पाप-पुण्य या संकल्पनांचं पुनर्वाचन

असो, प्राणिमात्रांविषयीचं एकूणच पर्यावरणाविषयीचं प्रकटलेलं भान असो, नीती–अनीतीबाबतची जागरूकता असो, माणसाविषयीची आस्था असो, या प्रकटलेल्या घटकांमुळे कथा नेहमीच्या स्वप्नरंजनात्मक बालसाहित्यापेक्षा निराळ्या झालेल्या आहेत. एकूण 'हाटूमुटूचा चंद्र' हा बालकथासंग्रह आजच्या घडीला आवश्यक त्या आशयसंपन्न अनुभवविश्वाची, मुलांना प्रशिक्षित करणारी चांगली सफर घडवणारा संग्रह आहे.

**- डॉ. शोभा नाईक**

◆

## १६ जून ते १५ जुलै २०२६ दरम्यानचा दिनविशेष
## दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर ५० टक्क्यांपर्यंत सूट

### खालील संचांवर १६ ते ३० जून दरम्यान खास सवलत

**१६ जून - डॉ. नंदकुमार उकडगावकर यांचा जन्मदिन**

'हेल मेट्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२६/-**

---

**जून महिन्यातील तिसरा रविवार - जागतिक पितृदिन**

'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर्स सोल, भाग - २', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स', 'चिकन सूप फॉर द सोल इंडियन फादर्स भाग २','चिकन सूप फॉर द फादर अॅन्ड सन सोल, भाग - १', 'चिकन सूप फॉर द फादर अॅन्ड सन सोल, भाग - २','चीपर बाय दी डझन', 'वपु', 'वपु सांगे वडिलांची कीर्ती', 'पितृऋण', 'स्वामीकार', 'असा असावा बाप', 'द सिन्स ऑफ द फादर', 'लेट हर फ्लाय' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३३९०/- । सवलत किंमत २१२६/-**

---

**१७ जून - संत कबीर यांचा जन्मदिन**

'भक्तीत भिजला कबीर', 'म्हणे कबीर दिवाणा', 'मी धार्मिकता शिकवतो, धर्म नाही!', 'साद घालतो कबीर', 'ऐका संतांनो', 'प्रेमरस... कबीरांचा!', 'धर्म कबीरांच्या मनातला', 'मृत्यू अमृताचे द्वार' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६४५/- । सवलत किंमत १०४९/-**

---

**१७ जून - प्रा. शशिकांत कुगांवकर यांचा जन्मदिन**

'नभांतमणी' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २९४/-**

---

**१९ जून - बेबी हालदार यांचा जन्मदिन**

'आलो-आंधारि' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**२० जून - रॉबर्ट क्रेस यांचा जन्मदिन**

'द वॉचमन', 'द वॉन्टेड', 'द मंकीज रेनकोट', 'ललबाय टाऊन' या पुस्तकांवर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १७४०/- । सवलत किंमत १०३८/-**

**२१ जून - ग्रेगरी डेव्हिड रॉबर्ट्स यांचा जन्मदिन**
'शांताराम' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ९९५/- । सवलत किंमत ६९७/-**

**२१ जून - स्वाती चांदोरकर यांचा जन्मदिन**
'अनाहत', 'आणि विक्रमादित्य हरला!', 'सेलिब्रेशन', 'एक पायरी वर', 'फॉरवर्ड अँड डिलिट', 'गोल गोल राणी', 'हिज डे', 'काळाकभिन्न', 'पवित्रम्', 'शेष', 'उत्खनन', 'वपु', 'युथनेशिया', 'तोड', 'सापशिडी', 'अथक', 'ब्लॉटिंग पेपर', 'डे-केअर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३८०५/- । सवलत किंमत २४७३/-**

**२१ जून - बहार दत्त यांचा जन्मदिन**
'हरित युद्धे' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**२१ जून - जागतिक संगीतदिन**
'मायकल जॅक्सन : एक जादू आणि बेधुंदी!', 'मंद्र', 'अभोगी', 'अनाहत', 'गंधर्वगाथा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३१८४/- । सवलत किंमत २०७०/-**

**२१ जून - जागतिक योग दिन**
**संच १ -** 'आपण आपले ताणतणाव - एक चिंतन', 'आरोग्यासाठी योग', 'पाठदुखी घालविण्यासाठी योगसाधना', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'ची रनिंग', 'ध्यानसूत्र', ''स' सुखाचा!', 'चिंता सोडा सुखाने जगा', 'पाणी : एक अद्भुत उपचारपद्धती', 'धन्वंतरी घरोघरी', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २३७०/- । सवलत किंमत १४६१/-**
**संच २ -** 'निरामय यशासाठी ध्यान', 'द माइंड जिम', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'स्थूलतेला करा टाटा', 'स्वत:चा शोध', 'अर्थाच्या शोधात', 'मनावर विजय', 'एकच पेला शिवाम्बूचा', 'चला जाणून घेऊ या! तंदुरुस्ती', 'पीस, लव्ह ॲन्ड हीलिंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत २२९०/- । सवलत किंमत १४७०/-**
**संच ३** - 'चिंतामुक्त जीवन', 'कार्यमग्न, व्यस्त लोकांसाठी योगसाधना', 'सर्व वयोगटांसाठी योगसाधना आणि ध्यानधारणा', 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'हसत-खेळत ध्यानधारणा', 'प्रिझनर्स ऑफ अवर थॉट्स', 'सुंदर मन', 'अन्नपुराण-

आयुर्वेदिक, आधुनिक', 'लव्ह, मेडिसिन आणि मिरॅकल्स', 'चला जाणून घेऊ या! योगविद्या', 'सौंदर्य आणि तारुण्य टिकविण्यासाठी योगसाधना' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २५४५/- । सवलत किंमत १६७५/-**

**२२ जून - डॅन ब्राऊन यांचा जन्मदिन**

'एन्जल्स अ‍ॅण्ड डेमन्स', 'डिसेप्शन पॉईंट', 'डिजिटल फॉर्ट्रेस', 'द दा विंची कोड', 'द लॉस्ट सिम्बॉल', 'इन्फर्नो', 'ओरिजिन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४१४०/- । सवलत किंमत २५०७/-**

**२२ जून - महादेव मोरे यांचा जन्मदिन**

महादेव मोरे यांच्या सत्तावीस पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६३२५/- । सवलत किंमत ३८३७/-**

**२२ जून - विकास स्वरूप यांचा जन्मदिन**

'सहा संशयित', 'स्लमडॉग मिलेनिअर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ७३२/-**

**२४ जून - बाबू गंजेवार यांचा जन्मदिन**

'चाणाक्ष' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २७७/-**

**२५ जून - सुधा रिसबूड यांचा जन्मदिन**

'अंतरिक्षाचा वेध', 'गार्डिअन', 'कल्पित-अकल्पित', 'रिचर्ड फाईनमन : एक हरहुन्नरी व्यक्तिमत्त्व' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ५०५/-**

**२५ जून - शशी पाटील यांचा जन्मदिन**

'एकच पेला शिवाम्बूचा' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

**२५ जून - जोना लेहरर यांचा जन्मदिन**

'प्रतिभेचा इंद्रधनू' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**२६ जून - छत्रपती शाहू महाराज जयंती**

'छत्रपती राजर्षी शाहू महाराज', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक मागोवा', 'राजर्षी

शाहू छत्रपती : पत्रव्यवहार आणि कायदे', 'राजर्षी शाहू छत्रपतींचे जाहीरनामे व हुकूमनामे', 'राजर्षी शाहू छत्रपतींची भाषणे', 'राजर्षी शाहू, कर्मवीर भाऊराव पाटील आणि प्रबोधनकार ठाकरे', 'राजर्षी शाहू छत्रपती : एक अभ्यास', 'समाजक्रांतिकारक राजर्षी शाहू छत्रपती', 'शाहू महाराजांच्या आठवणी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २१४५/- । सवलत किंमत १३९२/-**

---

**२६ जून - पर्ल एस. बक यांचा जन्मदिन**

'काळी', 'पिढी दर पिढी', 'द मदर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ११९०/- । सवलत किंमत ८२१/-**

---

**२७ जून - राम प्रधान यांचा जन्मदिन**

'पहिली फेरी?(१९६५ भारत-पाक युद्ध)', 'वादळ माथा ते १९६५ भारत-पाक युद्ध', 'माझी वाटचाल : मेटकॉफ हाउस ते राजभवन' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ६४९/-**

---

**२७ जून - ई. आर. ब्रेथवेट यांचा जन्मदिन**

'टू सर, विथ लव्ह' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १९४/-**

---

**३० जून - दिनकर जोषी यांचा जन्मदिन**

'अ-मृत पंथाचा यात्री', 'अंकरहित शून्याची बेरीज', 'अयोध्येचा रावण आणि लंकेचा राम', 'कालपुरुष', 'महाभारतातील मातृवंदना', 'महाभारतातील पितृवंदना', 'सुरम्य सूर्यास्त', 'रामायणातील पात्रवंदना', 'इथे कुणी नाही', 'महामानव सरदार पटेल', 'कृष्णं वन्दे जगद्‌गुरुम्', 'परतुनि ये घनश्याम', 'अमृतयात्रा', 'द्वारकेचा सूर्यास्त', 'भारतीय संस्कृतीचे सर्जक', 'प्रश्नप्रदेशापलीकडे', 'प्रकाशाची सावली', 'प्रतिनायक', 'चक्र ते चरखा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ४८००/- । सवलत किंमत ३०००/-**

---

**३० जून - करण बजाज यांचा जन्मदिन**

'कीप ऑफ द ग्रास' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

---

## खालील संचांवर १ ते १५ जुलै दरम्यान खास सवलत

**१ जुलै - जागतिक विनोददिन**

**संच १ -** ‘कसं बोललात! भाग १ ते ७’, ‘हसाल तर वाचाल’, ‘फुकट’, ‘गोलमाल’, ‘हेलमेट्स’, ‘झांझिबारी मसाला’, ‘तिंगाड’, ‘कांद्याचा वांदा’, ‘पु.ल. एक आनंदयात्रा’, ‘पुणं एक साठवण’, ‘गोष्टींचं एटीएम’, ‘खुमासदार अत्रे’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २६६५/- । सवलत किंमत १७३२/-**

**संच २ -** ‘गुदगुल्या’, ‘इल्लम’, ‘वावरी शेंग’, ‘खुशखरेदी’ ‘जुगलबंदी’, ‘ताजमहालमध्ये सरपंच’, ‘धिंड’, ‘जावईबापूंच्या गोष्टी’, ‘हुबेहूब’, ‘गुदगुल्या’, ‘भुताचा जन्म’, ‘हसणावळ’, ‘माझ्या बापाची पेंड’

**संचाची मूळ किंमत २२५०/- । सवलत किंमत १४६३/-**

---

**१ जुलै - इव्हा हॉफमन यांचा जन्मदिन**

‘कालाय नम:’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ११२/-**

---

**२ जुलै - जागतिक UFO दिन**

‘पृथ्वीवर माणूस उपराच!’, ‘देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!’, ‘अंतराळवीर सुनीता विल्यम्स’, ‘स्वप्नाकडून सत्याकडे...(कल्पना चावलाची कहाणी)’, ‘अंतराळ स्पर्धा’, ‘अंतरिक्षाचा वेध’, ‘जॉर्ज ॲन्ड द ब्लू मून’, ‘जॉर्ज ॲन्ड द शिप ऑफ टाईम’, ‘जॉर्ज ॲन्ड द अनब्रेकेबल कोड’, ‘जॉर्ज ॲन्ड द बिग बँग, ‘जॉर्जेस कॉस्मिक ट्रेझर हंट’, ‘जॉर्जेस सिक्रेट की टू द युनिव्हर्स’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३८१०/- । सवलत किंमत २३०४/-**

---

**२ जुलै - पीटर कुझनिक यांचा जन्मदिन**

‘अमेरिकेचा न सांगितला गेलेला संक्षिप्त इतिहास’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३४७/-**

---

**४ जुलै - नेथानिएल हॉथॉर्न यांचा जन्मदिन**

‘प्रायश्चित्त’, ‘शापित वास्तू’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६५०/- । सवलत किंमत ४५५/-**

---

**४ जुलै - डॉ. अरविंद कुलकर्णी यांचा जन्मदिन**

‘उपयोजित समीक्षा : लक्षणे आणि पडताळणी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ११२/-**

**४ जुलै - व्हेरा गिसिंग यांचा जन्मदिन**

'आठवणींचे मोती' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३६०/- । सवलत किंमत २५२/-**

**४ जुलै - नीरज कुमार यांचा जन्मदिन**

'खाकी फाइल्स' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १७५/-**

**४ जुलै - जीन सॅसन यांचा जन्मदिन**

'ग्रोईंग अप बिन लादेन', 'मयादा - इराकची कन्या', 'युवराज्ञी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०६५/- । सवलत किंमत ६११/-**

**५ जुलै - वीर संघवी यांचा जन्मदिन**

'नवभारताचे शिल्पकार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ९८/-**

**६ जुलै - रेखा बैजल यांचा जन्मदिन**

'अज्ञेय', 'प्रस्थान' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३४०/- । सवलत किंमत १६९/-**

**७ जुलै - परमपूज्य दलाई लामा यांचा जन्मदिन**

'करुणेचे बीज', 'परमसुखाची पर्वणी', 'धर्मांमधील बंधुत्वाच्या मार्गावर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ७३०/- । सवलत किंमत ५१५/-**

**१० जुलै - ख्रिस टर्नी यांचा जन्मदिन**

'१९१२ : अंटार्क्टिकाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४५०/- । सवलत किंमत ३१५/-**

**११ जुलै - रिमल चंगेडे यांचा जन्मदिन**

'आजचा मेनू' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २९५/- । सवलत किंमत १४६/-**

**११ जुलै - झुंपा लाहिरी यांचा जन्मदिन**

'द नेमसेक' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १४९/-**

**११ जुलै - जेन गार्डम यांचा जन्मदिन**
'द मॅन इन द वुडन हॅट' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-**

**१२ जुलै - जागतिक मलाला दिन**
'मी मलाला' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २४९/-**

**१२ जुलै - मनोहर माळगांवकर यांचा जन्मदिन**
'इथे थबकली गंगामाई', 'कान्होजी आंग्रे', 'दि प्रिन्सेस', 'वादळवारा' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १८५९/- । सवलत किंमत १३०१/-**

**१३ जुलै - बाजीप्रभू बलिदान दिन**
'पावनखिंड', 'श्रीमान योगी', या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ७३२/-**

**१५ जुलै - अनंतराव खरात यांचा जन्मदिन**
'शर्यती-स्पर्धा-खेळ' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

◆


**- किमतींमध्ये बदलाची शक्यता -**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / Whats App No. **९४२०५९४६६५**
website : www.mehtapublishinghouse.com
**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**
author@mehtapublishinghouse.com

मेहता पब्लिशिंग हाऊस आयोजित
बालवाचकांसाठी **उन्हाळी सुट्टीतील** मजेशीर उपक्रम...


# गोष्टींची सुट्टी



RNI. No. MAHMAR/2000/02739
Posting at BPC - Round Garden, Vijayanagar Colony, Sadashiv Peth, Pune - 411030.
Publication Date : 11/06/2026 Posting Date : 11/06/2026


# आवर्जून वाचावं...















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन - (०२०) २४४७६९२४

प्रति,